**आडवी विधाने** :– 1) 'तो मी नव्हेच', 'लग्नाची बेडी' यासारखी प्रसिद्ध नाटके लिहिणारे प्रख्यात साहित्यिक यांचे पूर्ण नाव 4) दक्षिण–मध्य रेल्वेचे मुख्यालय या शहरात आहे. 8) प्रसिद्ध चित्रपट अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपूरे यांनी स्थापन केलेली एक सामाजिक संस्था 9) कपाळ 10) भाजपाचे नेते असलेले मनेका गांधी यांचे पुत्र 12) प्राचीन भारतातील आता पाकिस्तानमध्ये असलेले आणि युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेले प्राचीन विद्यापीठ 13) जुन्या गुमनाम आणि जब जब फूल खिले या चित्रपटांची नायिका 14) छंद, आवड 15) तिबेटच्या पठारावर वसलेला व हिंदू, जैन व बौद्ध धर्मियांसाठी पवित्र स्थळ असलेला पर्वत 17) व्यंकटेश माडगुळकरद्वारा लिखित एक साहित्यकृती 18) फाळणीवर आधारीत गोविंद निहलानीद्वारा दिग्दर्शित व भीष्म साहनी, ओम पुरी, दीपा साहीची एक जुनी दूरदर्शन मालिका 19) मिळकत, प्राप्ती 20) पुष्पकण 21) छान, मस्त 23) अरबस्थानातील ते ठिकाण ज्याठिकाणी इमाम हुसैन हे आपल्या सहकाऱ्यांसोबत शहिद झाले होते 26) विद्येची देवी, शारदा 27) तराजू 29) मुस्लिमांनी केलेली अल्लाची प्रार्थना 30) लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक आणि विपिनचंद्र पाल यांना एकत्रितरित्या या नावे ओळखले जायचे 31) क्रोध, संताप 33) जगन्नाथपुरीचे संक्षिप्त उच्चारण 34) एकनिष्ठ शिवभक्त पण शिव व विट्ठल एकच आहे असा साक्षात्कार झाला आणि आपले सारे जीवन विठ्ठलमय केले असे एक संत 38) मुस्लिमानी केलेली मक्का–मदिन्याची यात्रा 40) राजस्थानातील एक प्रख्यात लोकनृत्यप्रकार 42) सत्यकथेवर आधारीत एका हिंदी चित्रपटात मार्क जुबेर, शबाना आझमी व दीप्ति नवल 43) कॅप्टन कूल म्हणून प्रसिद्ध क्रिकेटपटूचे टोपणनाव 44) रशिया देशाचे चलन 45) 'आधा है चन्द्रमा रात आधी....' हे गीत या चित्रपटातील आहे. 48) अमिताभ, रणधीर कपूर, जीनत अमानचा एक चित्रपट 49) शीख धर्माचे संस्थापक 51) एक प्रकारचा चकचकीत दगड 54) राणी लक्ष्मीबाईचे लहानपणीचे नाव 56) सुविख्यात साहित्यिक पु.ल. देशपांडे यांनी लिहिलेली प्रसिद्ध साहित्यकृती 57) लहान शहर 59) शीतल, थंड 60) भारतातील क्षेत्रफळानुसार सर्वात मोठा लोकसभा मतदार संघ 62) अशोककुमार यांचे सिनेसृष्टीत प्रचलीत नाव 63) रिसर्च अ‍ॅन्ड अ‍ॅनालिसीस विंग संस्थेचे संक्षिप्त नाव 64) इस्लामी कालगणनेनुसार येणारा 9 वा महिना 65) इंग्रजीत धाव 66) डोळे, चक्षु


**उभी विधाने** :– 1) जागतिक स्तरावर साजरा होणारा 5 मे हा दिवस 2) आचार्य बाळ शास्त्री जांभेकर यांनी सुरु केलेले मराठी भाषेतील पहिले साप्ताहिक 3) महाराष्ट्र राज्याचे एक माजी उपमुख्यमंत्री 4) हिमाचल प्रदेशची राजधानी 5) स्वातंत्र्यपूर्व काळात आर्य समाजाची स्थापना करणारे समाज सुधारक 6) लहान मूल 7) भारतात आश्रय घेतलेले तिबेटचे धार्मिक गुरु 8) द्राक्षांसाठी प्रसिद्ध असलेला महाराष्ट्रातील एक जिल्हा 11) गुजरात राज्याची राजधानी 14) मंत्रिमंडळातील सदस्यांचा हुद्दा 15) रामायणात श्रीरामाला वनात धाडण्याचा आग्रह करणारी राणी 16) कथा, चष्मेबद्दूर, स्पर्श आदि चित्रपट दिग्दर्शित करणाऱ्या प्रसिद्ध मराठी लेखिका 17) अमेरिकेचे 44 वे माजी राष्ट्राध्यक्ष 18) गवताची काडी 22) इंदिराजी गांधी यांच्या मातोश्रीचे नाव 24) प्रसिद्ध क्रांतिकारक भगतसिंग यांचे जन्मस्थान 25) महाराष्ट्रातील पहिला मेगा फूडपार्क या शहरात उभारण्यात आला आहे. 28) 2012 च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये 10 मीटर एअर रायफल स्पर्धेत कांस्य पदक मिळविणारा भारतीय नेमबाजा 29) या चित्रपटात श्रीदेवीने इचछाधारी नागिण साकारली 32) अक्षय खन्ना, सोनाली बेन्द्रेचा एक चित्रपट 35) चारशेऐंशी कागदाचे पुडके 36) उत्कृष्ट चादरींसाठी प्रसिद्ध असलेले महाराष्ट्रातील एक शहर 37) बेतास बेत, नेमके 39) भारतातील पश्चिम–मध्य रेल्वेचे मुख्यालय या शहरात आहे 41)अमिताभची तिहेरी भूमिका असलेला एक चित्रपट 46) पहिला ऋतू 47) जाणे 49) जगातील सर्वात लांब असलेली नदी 50) दणकट 52) पाणीदार 53) देवाने प्रसन्न होऊन दिलेली देणगी 55) हानी, व्यय 56) आफ्रिका खंडामध्ये सर्वत्र खडकाळ वाळवंटी प्रदेशात आढळणारी पालीची जात 58) कम्युनिस्ट तत्वज्ञानाचे उद्गाते आणि प्रचारक 61) पाकिस्तानातील एक अग्रणी वर्तमानपत्र (उत्तर पुढील अंकी)

### G.K. महाशब्दकोडे 16 चे उत्तर



# सामान्य कुटुंबातील असामान्य स्वप्न

## तृप्ती भट्ट यांचा प्रवास : अल्मोडा पासून IPS पर्यंत



१६ सरकारी नोकऱ्या नाकारून UPSC परीक्षेत यश मिळवणाऱ्या IPS तृप्ती भट यांची कहाणी ही जिद्द, ध्येयाने पछाडलेपणा आणि स्वतः वरच्या विश्वासाची ताकद दर्शवणारी प्रेरणादायी गाथा आहे. अनेक उमेदवार णझडउ सारख्या कठीण परीक्षेसाठी तयारी करताना सुरक्षित पर्याय म्हणून मिळालेल्या नोकऱ्या स्वीकारतात, पण तृप्ती भट्ट यांनी उलटा मार्ग निवडला–त्यांनी १६ सरकारी नोकऱ्या नाकारून णझडउ च्या ध्येयाचा पाठपुरावा केला, आणि पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले.

**तृप्ती भट्ट यांचा प्रवास : अल्मोडा पासून IPS पर्यंत**

**सामान्य कुटुंबातील असामान्य स्वप्न**

तृप्ती भट्ट यांचा जन्म उत्तराखंडमधील अल्मोडा जिल्ह्यातील मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. घरात शिस्त, शिक्षणाला महत्व आणि उच्च ध्येय ठेवण्याची वृत्ती लहानपणापासूनच त्यांच्या मनात रुजली.

अभ्यासात त्या कायमच उजवी होत्या. त्यांच्या पालकांनी त्यांना मोठं स्वप्न पाहायला आणि त्या दिशेने निर्धाराने मेहनत करायला कायम प्रोत्साहन दिलं.

अभियांत्रिकीपासून प्रतिष्ठित नोकऱ्यांपर्यंतचा टप्पा

तृप्तींनी पंतनगर कृषी विद्यापीठातून अभियांत्रिकीची पदवी पूर्ण केली. पदवी पूर्ण होताच त्यांना अनेक आकर्षक आणि सुरक्षित नोकरीच्या संधी मिळाल्या–

NTPC मध्ये सहाय्यक व्यवस्थापक

भारताच्या सर्वात मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांपैकी एक असलेल्या NTPC मध्ये तृप्तींना उत्तम पगाराची आणि प्रतिष्ठेची नोकरी मिळाली.

ISRO मध्ये संधी

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेत काम करण्याची संधी ही कोणत्याही तरुण अभियंत्यासाठी अभिमानाची बाब असते. तृप्तींनाही ही सुवर्णसंधी मिळाली.

इतर १६ सरकारी नोकऱ्यांचे प्रस्ताव

सरकारी क्षेत्रात उत्तम करिअर मिळवण्यासाठी तरुण धडपडत असताना तृप्तींकडे एकूण **१६ अशा नोकऱ्यांच्या संधी** होत्या ज्या एक सुरक्षित भविष्य देऊ शकल्या असत्या.

पण त्यांचं ध्येय वेगळंच होतं.

UPSC – एकमेव लक्ष्य

तृप्तींचं स्वप्न केवळ उच्च पगार किंवा सुरक्षित नोकरी मिळवण्यापुरतं मर्यादित नव्हतं. त्यांना देशसेवा करण्याची तीव्र इच्छा होती. त्यांनी ठाम निर्णय घेतला–

माझं ध्येय नागरी सेवेत जाण्याचं आहे, बाकी सर्व पर्याय दुय्यम आहेत.

हे म्हणणं सोपं होतं, पण त्यासाठी स्वतःवरील विश्वास, त्याग, कुटुंबाचा पाठिंबा आणि अतोनात मेहनत आवश्यक होती.

UPSC ची तयारी : संघर्ष, शिस्त आणि आत्मविश्वास

UPSC ही भारतातील सर्वात कठीण नागरी सेवा परीक्षा म्हणून ओळखली जाते. लाखो विद्यार्थी दरवर्षी प्रयत्न करत असताना मोजकेच यशस्वी होतात.

तृप्तींनी पूर्ण लक्ष UPSC वर केंद्रीत केले–

- दिवसाला ८–१० तास अभ्यास
- वाचन, नोट्स, पुनरावृत्ती यांची शिस्तबद्ध पद्धत
- सध्याच्या घडामोडींचा सखोल अभ्यास
- उत्तरलेखनाचा नियमित सराव

–अनेक वेळा मानसिक दडपण आणि अनिश्चितता, पण हार न मानण्याची वृत्ती

पहिल्याच प्रयत्नात १६५ वा क्रमांक

२०१३ मध्ये णझडउ निकाल जाहीर झाला आणि तृप्तींनी पहिल्याच प्रयत्नात अखिल भारतीय स्तरावर १६५ वा क्रमांक मिळवला.

ही कामगिरी प्रेरणादायी ठरते कारण–

–अनेक उमेदवारांना णझडउ उत्तीर्ण होण्यासाठी २–३ किंवा अधिक प्रयत्न करावे लागतात

– तृप्तींनी सर्व नोकऱ्या नाकारून एकच लक्ष्य ठेवले

– आणि पहिल्याच प्रयत्नात यश मिळवून दाखवले

IPS म्हणून निवड आणि सध्याची जबाबदारी

UPSC उत्तीर्ण झाल्यानंतर तृप्ती भट्ट यांची निवड भारतीय पोलिस सेवेत (IPS) झाली.

सध्या त्या उत्तराखंडच्या डेहराडूनमध्ये SP (इंटेलिजन्स अँड सिक्युरिटी) पदावर कार्यरत आहेत.

त्यांच्या कार्यशैलीत–

–उच्च शिस्त

–व्यावसायिकता

–संवेदनशील प्रकरणांचे प्रभावी हाताळणी

–समाजातील दुर्बल घटकांच्या सुरक्षेसाठी विशेष उपक्रम

या गोष्टी विशेष म्हणून ओळखल्या जातात.

तृप्ती भट्ट का बनतात प्रेरणादायी?

–ध्येयासाठी सुरक्षित पर्याय सोडण्याची हिम्मत

– स्वतःवरील विश्वास

–कठोर परिश्रम आणि मजबूत अभ्यास योजना

–पहिल्याच प्रयत्नात UPSC पास

– देशसेवेसाठीची खरी निष्ठा

त्यांची कहाणी हे सिद्ध करते–

जर ध्येय मोठं असेल, मेहनत प्रामाणिक असेल, आणि प्रयत्न सातत्यपूर्ण असतील तर काहीही अशक्य नाही.

# रेल्वेच्या कॉन्स्टेबल भरती परीक्षेत डमी उमेदवार

**बसविण्याचा धक्कादायक प्रकार उघड, नाशिक जिल्ह्यातील घटना**

**नौकरी एक्सप्रेस**
**नाशिकरोड/प्रतिनिधी/** रेल्वे सुरक्षा दल (RPF) कॉन्स्टेबल भरती परीक्षेत डमी उमेदवार बसवल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाल्याने भरती प्रक्रियेतील सुरक्षेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील सामनगाव येथे घडलेल्या या प्रकरणामुळे केवळ उमेदवारांच्या प्रामाणिकतेवरच नाही, तर भरती व्यवस्थेतील कडक पडताळणी यंत्रणाही तपासली जात आहे.

कसा झाला प्रकार?

हरियाणातील सोनिपत जिल्ह्यातील गुहाना गावचा २० वर्षीय शिवापुत्र श्रीअजयकुमार हा ठझक्र कॉन्स्टेबल पदासाठी पात्र उमेदवार होता. मार्च २०२५ मध्ये नवी दिल्लीत झालेल्या लेखी परीक्षेसाठी त्याने स्वतः न जाता एका अनोळखी व्यक्तीला डमी उमेदवार म्हणून पाठवले. लेखी परीक्षेवेळी बायोमेट्रिक चाचणी अंतर्गत डमी उमेदवाराचे **बोटांचे ठसे, चेहर्याची संरचना, आणि डोळ्यातील बाहुल्यांची स्कॅनिंग नोंदवली गेली.

डमी उमेदवाराने लेखी परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर, पुढील टप्प्यातील शारीरिक चाचणीसाठी शिवापुत्र स्वतः हजर झाला. त्याला वाटले की शारीरिक चाचणीत फसवणूक समोर येणार नाही; मात्र भरती प्रक्रियेत बायोमेट्रिक व्हेरिफिकेशन अनिवार्य असल्यामुळे त्याची फसवणूक उघड झाली.

उघडकीस कसा आला गुन्हा?

शारीरिक चाचणीवेळी शिवापुत्रचे बायोमेट्रिक डेटा आणि लेखी परीक्षेतील बायोमेट्रिक डेटा यांची तुलना झाली.

बोटांचे ठसे जुळले नाहीत.



चेहर्यावरील बायोमेट्रिक पॅटर्न वेगळे होते.

आयरीस स्कॅनमध्ये मोठी तफावत आढळली.

यानंतर भरती शिबिरातील अधिकाऱ्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. तपास अधिकारी अजित शिंदे आणि त्यांच्या पथकाने चौकशी केली असता शिवापुत्रने डमी उमेदवार बसविल्याची कबुली दिली.

पोलिस कारवाई व पुढील तपास

नाशिकरोड पोलिस ठाण्यात संबंधित युवकावर शासनाची फसवणूक, कागदपत्रांची बनावटगिरी आणि परीक्षेत गैरप्रकार केल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

–पोलिसांनी शिवापुत्रला ताब्यात घेतले असून लेखी परीक्षेला बसलेल्या

–अज्ञात डमी उमेदवाराचा शोध तीव्रतेने सुरू आहे.

तपास यंत्रणेला असा संशय आहे की

– या प्रकरणामागे गुन्हेगारी टोळी अथवा रॅकेट असू शकते,

–डमी उमेदवाराकडून मोठी रक्कम घेतली गेली असण्याची शक्यता आहे,

– इतर उमेदवारांमध्येही अशाच प्रकारचे गैरप्रकार घडले का याची तपासणी सुरू आहे.

भरती प्रक्रियेतील सुरक्षेवर परिणाम

या घटनेमुळे ठझक्र तसेच इतर सरकारी भरती प्रक्रियांमध्ये बायोमेट्रिक पडताळणीची आवश्यकता पुन्हा अधोरेखित झाली आहे. विशेषतः राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये वाढत्या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे फसवणुकीचे प्रकारही अधिक गुंतागुंतीचे होत आहेत.

शिक्षण क्षेत्रातील धक्कादायक कारवाईशी तुलना

यापूर्वीही विविध विभागांमध्ये खोटी माहिती देऊन किंवा बनावट कागदपत्रांच्या आधारे नियुक्त्या मिळवण्याचे प्रकार उघड झाले आहेत. अलीकडेच बदली प्रक्रियेत खोटी माहिती दिल्याप्रकरणी जिल्हा परिषद शाळेतील ९ शिक्षकांना निलंबित करण्यात आले होते.या घटनांमुळे शासन यंत्रणेत पारदर्शकता वाढविण्यासाठी कडक पडताळणी यंत्रणा, बायोमेट्रिक सत्यापन, आणि डिजिटल नोंदणीचे महत्त्व अधिक स्पष्ट होत आहे.ही घटना ठझक्र भरती प्रक्रियेतील मोठा गैरप्रकार उघड करणारी असून, पोलिस आणि भरती प्रशासक पुढील टप्प्यात आणखी तपास व छाननी करत आहेत.

# नेपाळची नवी खोड

नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश. जगातील एकमेव हिंदू धर्मीय देश. भारत हा देखील हिंदू संस्कृतीचा पाईक त्यामुळे दोन्ही देशातील चालीरीती, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा सारखीच त्यामुळे नेपाळ हा भारताचा शेजारी आसला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. नेपाळवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक शतकांपासून भारत आणि नेपाळचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत नेपाळ संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना नेपाळ मात्र काही खोड काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. नेपाळने अशीच एक नवी खोड काढून दोन्ही देशातील तणाव पुन्हा वाढवला आहे. नेपाळने गुरुवारी १०० रुपयांच्या नोटेचे अनावरण केले. या नोटा छापण्याचे कंत्राट त्यांनी चीनमधील एका कंपनीला दिले आहे अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. नोटा बदलण्याचा, त्याची डिझाईन बदलण्याचा, आणि त्याची छपाई कोठून करायची याचा सर्वस्व अधिकार नेपाळचा असल्याने भारताने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही भारताने यावर आक्षेप घेतला नाही मात्र या नोटाचे अनावरण करण्यात आले त्यावेळी मात्र भारताने त्यावर आक्षेप घेतला कारण या नव्या नोटेवर नेपाळने त्यांचा नवा सुधारित नकाशा छापला असून त्या नकाशात लीपुलेख, लिम्पियाधूरा आणि कालापाणी हे भूभाग नेपाळमध्ये दाखवले आहेत. वास्तविक भारत – नेपाळ सीमेवरील हे भूभाग भारतीय सीमेत आहे मात्र नेपाळ त्यावर दावा करत आहे. खूप वर्षापासून हा वाद चालू असल्याने दोन्ही देशात यावरून अनेकदा तणाव निर्माण झाला. हा वादग्रस्त भाग असल्याने नेपाळने त्यावर दावा करू नये असे भारताचे म्हणणे आहे. तरीही नेपाळ हा विषय ऐन केन प्रकरणाने उकरून काढत आहे. नेपाळ भारताची सातत्याने खोड काढत आहे कारण त्याला चीनची फुस आहे. मागील काही वर्षापासून नेपाळ हा चीनच्या नादी लागला आहे. चीनने नेपाळला कर्ज देऊन नेपाळला आपल्या अंकित केले आहे. नेपाळचे सध्याचे सरकार हे चीन धार्जिणे आहे. चीन सांगेल तेच ते करत आहे एकाअर्थी नेपाळमधील विद्यमान सरकार हे चीनच्या हातचे बाहुले आहे.

**पुढील वृत्त पान ७ वर...**

# पेपरफुटीचे धागेदोरे बिहारपर्यंत

**नौकरी एक्सप्रेस**
**नाशिक/प्रतिनिधी/** टीईटी पेपरफुटी प्रकरण आता राज्याच्या सीमा ओलांडून बिहारपर्यंत पोहोचत असल्याचे स्पष्ट होत आहे. तपास जसजसा पुढे जात आहे, तसतसे या रॅकेटचा विस्तार, त्यातील व्यक्तींचा नेटवर्क आणि परीक्षा व्यवस्थेतल्या उणिवा अधिक ठळकपणे समोर येत आहेत. आतापर्यंत २२ आरोपींना अटक झाली असून त्यात शिक्षक, प्राध्यापक, दलाल आणि पेपर पुरवणाऱ्या व्यक्तींचाही समावेश आहे. यामुळे या गुन्ह्याची गंभीरता आणि व्यापकता अधोरेखित होते.

तपास पथकाने दिलेल्या माहितीनुसार, पेपर पुरवणारा मुख्य संशयित आरोपी रितेशकुमार हा बिहारमधील असल्याचे उघड झाले आहे. त्याने देशातील विविध राज्यांतील संपर्कांचा वापर करून पेपर मिळवून तो महाराष्ट्रातील काही टोळ्यांना पुरवल्याचा संशय आहे. कराड तालुक्यातील गायकवाड बंधूंचे नावही या नेटवर्कमध्ये पुढे आले असून, हे सर्वजण २० नोव्हेंबरला पुण्यातील एका हॉटेलमध्ये एकत्र आल्याचे उउढत फुटेज व साक्षांच्या आधारे स्पष्ट झाले आहे. त्यावेळी रितेशकुमारसोबत आणखी पाच जण होते, त्यांचीही संपूर्ण माहिती पोलिसांकडे उपलब्ध आहे. या सर्वांवर लवकरच निर्णायक कारवाई होणार असल्याचे संकेत तपास यंत्रणांनी दिले.



**शिक्षक-प्राध्यापकांचा सहभाग; शिक्षण क्षेत्र हादरले**

पेपरफुटीमध्ये शिक्षक आणि प्राध्यापकांचा सहभाग समोर आल्यानंतर शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. अटक झालेल्या प्राध्यापकांपैकी तिघेही डएढ उत्तीर्ण आहेत. अशा पात्र व्यक्तींचे गुन्ह्यात अडकणे हे केवळ धक्कादायक नसून, उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षांच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करते. शिक्षण सहसंचालक प्रकाश बच्छाव यांनी या प्राध्यापकांवर कठोर कारवाई होणार असल्याचे संकेत दिले आहेत. संबंधित शिक्षकांवरही विभागाकडून शिस्तभंगाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे संशयास्पद वर्तन

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा आणि चिंताजनक मुद्दा म्हणजे पुणे येथील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे सहकार्य न करणे. तपासासाठी आवश्यक कागदपत्रे, तांत्रिक माहिती आणि गोपनीय रेकॉर्ड मागण्यासाठी तपास अधिकारी परिषदेच्या कार्यालयात गेले असता, त्यांनी माहिती देण्यास नकार दिला.

‘गोपनीय कागदपत्रे’ या कारणाखाली परिषद अधिकारी माहिती देण्यास तयार नव्हते, ज्यामुळे तपासाची गती मंदावली असून यामुळे परिषद व्यवस्थेवर अधिकच संशय निर्माण झाला आहे.तपास पथकाने याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, अशा वर्तनामुळे पेपरफुटीच्या मूळ स्रोतांचा शोध घेणे अवघड होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जप्ती आणि पुढील तपास

आतापर्यंत पोलिसांनी दोन कार, १९ मोबाईल फोन आणि तब्बल २५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जप्त केलेल्या मोबाईलमधील चॅट्स, कॉल रेकॉर्ड, व्यवहारांची माहिती आणि लोकेशन डेटा तपासात अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.कराड, पुणे आणि बिहार येथे स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली असून, या रॅकेटमागील मुख्य सूत्रधार, आर्थिक देवघेव आणि परीक्षा प्रणालीतील आतल्या मदतीचा शोध घेण्यासाठी तपास अधिक व्यापक करण्यात आला आहे.

SET आणि इतर परीक्षांबाबतही संशय

टीईटी पेपरफुटीमध्ये SET पास प्राध्यापकांचा सहभाग आढळल्याने, SET सहित इतर स्पर्धा परीक्षांबाबतही काही गडबड अथवा अनियमितता असल्याचा संशय अधिक गडद झाला आहे. त्यामुळे या परीक्षांच्या पारदर्शकता आणि सुरक्षेविषयी मोठी चर्चा सुरू झाली आहे. भविष्यात डएढ व तत्सम परीक्षांच्या सुरक्षाव्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणीही वेगाने वाढत आहे.या संपूर्ण प्रकरणामुळे शिक्षक पात्रता परीक्षेची विश्वसनीयता धोक्यात आली असून, हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तपास यंत्रणांनी विस्तृत आणि जलद कारवाई सुरू केल्याने या रॅकेटचा संपूर्ण पर्दाफाश होण्याची शक्यता वाढली आहे.

# ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी ६२ व्या वर्षी थाटला संसार

**नौकरी एक्सप्रेस**
**दिल्ली/प्रतिनिधी/**ऑस्ट्रे लियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित हा मोठा आणि चर्चे चा विषय आहे. ६२ वर्षांच्या अल्बानीज यांनी आपल्यापेक्षा तब्बल १७ वर्षांनी लहान असलेल्या जोडी हेडन यांच्याशी विवाह करून आपला जीवनप्रवासाचा नवा अध्याय सुरू केला आहे. हा विवाहसोहळा २३ नोव्हेंबर रोजी कॅनबेरा येथे अतिशय जिव्हाळ्याच्या आणि मनमोहक वातावरणात पार पडला.

सोशल मीडियावर त्यांनी विवाहसोहळ्याचे फोटो व व्हिडिओ शेअर करत legally married असा छोटा पण भावनिक संदेश पोस्ट केला. त्यांच्या या पोस्टनंतर जगभरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

कशी फुलली प्रेमकहाणी?

अँथनी अल्बानीज आणि जोडी हेडन यांची भेट मार्च २०२० मध्ये मेलबर्नमधील एका बिझनेस डिनरदरम्यान झाली. ती भेट सुरुवातीला साध्या व्यावसायिक ओळखीतून सुरू झाली. पण संवाद, विचारसाम्य आणि एकमेकांची साथ यांमुळे लवकरच त्यांचे मैत्रीत रूपांतर झाले आणि मैत्री हळूहळू प्रेमात विरघळली.

जोडी हेडन यांनी २०२२ आणि २०२५ च्या ऑस्ट्रेलियन फेडरल निवडणुकांमध्ये अल्बानीज यांना सक्रिय पाठिंबा दिला. सार्वजनिक कार्यक्रमांपासून राजकीय मोहीमांपर्यंत त्या त्यांच्या सोबत दिसू लागल्या आणि हळूहळू त्या अल्बानीज यांच्या जीवनातील महत्वाची व्यक्ती ठरल्या.

व्हॅलेंटाईन डे प्रपोजल

२०२४ मध्ये व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी, अल्बानीज यांनी जोडी हेडनला प्रपोज केले. त्यावेळी त्यांनी जाहीर केले की *मला असा जोडीदार मिळाला आहे, जो आयुष्यभर माझ्या सोबत राहण्यास तयार आहे.* या एका वाक्यात अल्बानीज यांची भावनिकता



आणि जोडीबद्दलची जिव्हाळ्याची भावना स्पष्ट होत होती.

कोण आहेत जोडी हेडन?

–४५ वर्षीय जोडी हेडन या:

–व्यावसायिक वकील,

–ऑस्ट्रेलियातील वित्तीय सेवा क्षेत्रातील अनुभवी नेत्या,

–आणि महिलांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात.

–त्यांनी बँकिंग आणि वित्तीय संस्थांमध्ये जवळपास २० वर्षे काम केले आहे.

–२०२२ मध्ये त्या वुमेन्स ऑफिसर या महत्वाच्या पदावर निवडल्या गेल्या.

–याशिवाय, NSW पब्लिक सर्व्हिस असोसिएशनमध्ये त्या युनियन डेलिगेट म्हणूनही सक्रिय राहिल्या आहेत.

–सध्या त्या धोरणात्मक नेतृत्व आणि महिला सक्षमीकरणासाठी काम करत असून ऑस्ट्रेलियात त्यांचा प्रभाव आणि प्रतिष्ठा दोन्ही मोठे आहेत.

अल्बानीज यांचे पहिले लग्न

अँथनी अल्बानीज यांचे हे दुसरे लग्न आहे. यापूर्वी त्यांनी NSW च्या माजी उपमुख्यमंत्र्या कार्मेल टेब्बट यांच्याशी विवाह केला होता. जवळपास २० वर्षे त्यांच्या वैवाहिक जीवनाने गोड साथ दिली पण २०१९ मध्ये दोघे वेगळे झाले.

त्यांना त्यांच्या पहिल्या पत्नीपासून नाथन अल्बानीज नावाचा एक मुलगा आहे, जो सध्या तरुण राजकीय कार्यक्रमांमध्ये व सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय दिसतो.

विवाहसोहळ्याची झलक

कॅनबेरा येथे झालेल्या विवाहसोहळ्यात अल्बानीज आणि हेडन यांनी अतिशय साध्या, पण देखण्या पद्धतीने लग्नगाठ बांधली. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील निवडक पाहुणे उपस्थित होते. वातावरणात उत्साह, भावनिकता आणि नवीन जीवनप्रवासाची सुरूवात यांचा सुंदर मिलाफ होता.

अँथनी अल्बानीज आणि जोडी हेडन यांचे हे लग्न सध्या ऑस्ट्रेलियातच नव्हे तर जगभरात चर्चेचा विषय बनले आहे. वयातील अंतर, जीवनातील दुसरी संधी आणि प्रेमाने दिलेला नव्या आशांचा आधार–या सर्व गोष्टींमुळे ही प्रेमकथा अनेकांना प्रेरणादायी वाटत आहे.

# राज्य राखीव पोलिस बल,जालना शिपाई भरती - २०१७

**प्र.१-भारतात कोणता दिवस राष्ट्रीय ग्राहकदिन म्हणून ओळखला जातो?**

(अ)२४ डिसेंबर (ब)१५ मार्च (क)१ जुलै (ड)२ ऑक्टोबर

**प्र.२-अंदमान-निकोबार बेटांचे राजधानीचे शहर कोणते आहे?**

(अ)छागोस (ब)मालदीव (क)पोर्ट ब्लेअर(ड)विशाखापट्टणम

**प्र.३- भारतातील एकमेव जिवंत ज्वालामुखी कोठे आहे?**

(अ)लक्षव्दीप (ब)अंदमान (क)छागोस (ड)मालदीव

**प्र.४-कोणत्या प्रदेशाला देवभूमी असेही म्हणतात?**

(अ)उत्तराखंड (ब)हरियाणा (क)हिमाचल प्रदेश(ड)यापैकी सर्व

**प्र.५-भारताच्या कोणत्या दिशाला बंगालचा उपसागर आहे?**

(अ) ईशान्य (ब)अग्नेय (क)नैऋत्य (ड)वायव्य

**प्र.६-भारतात नियमितपणे किती वर्षांनी जनगणना होत असते?**

(अ)७ (ब)५ (क)११ (ड)१०

**प्र.७-........ हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा आहे?**

(अ)प्रमिनीधी (ब)लोक (क)पंतप्रधान (ड)लोकसभा

**प्र.८-अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यासाठी जोती निर्मुलन आवश्यक आहे असे कोणाचे मत आहे?**

(अ)डॉ.बाबासाहेब आंबेडकर(ब)छत्रपती शाहु महाराज
(क)पेरियार रामस्वामी नायकर (ड)यापैकी सर्व

**प्र.९-भारतात कोणत्या प्रकारची लोकशाही आहे?**

(अ)अप्रत्यक्ष (ब)अध्यक्षीय (क)प्रत्यक्ष (ड)मिश्र

**प्र.१०-भारतीय अवककाश संशोधनाचे अध्वर्यू कोणास म्हणतात?**

(अ) सतीश धवन (ब)विक्रम साराभाई
(क)माधवन नायर (ड)डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम

**प्र.११-मोडेम हे संगणकाचे कोणते डिव्हाईस आहे?**

(अ)इनपूट (ब)आऊटपूट (क)कम्युनिकेशन (ड)स्टोरेज

**प्र.१२-अझाद हिंद सेनेची स्थापना कोणी केली?**

(अ)राजबिहारी बोस (ब)चंद्रशेखर आझाद
(क)सुभासचंद्र बोस (ड)रामप्रसाद बिस्मील

**प्र.१३-जगाची विभागणी एकूण किती खंडात झाली आहे?**

(अ)३ (ब)५ (क)४ (ड)७

**प्र.१४-हिटलरच्या ........... आत्मचरित्रातून त्याच्या नाझीवादाचे स्वरूप स्पष्ट होते.**

(अ)दास कॅपिटल (ब)माईन काम्फ
(क)तरूण तुर्क (ड) आपला लढा

**प्र.१५-पहिले महायुध्द केव्ह सुरू झाले?**

(अ)१९१४ (ब)१९१६ (क)१९१३ (ड)१९१५

**प्र.१६-भारतात सर्वप्रथम व्यापारामित्त कोण ओले होते?**

(अ)पोर्तुगीज(ब)इंग्रज(क)डच(ड)फ्रेंच

**प्र.१७-दवाखाना, शैक्षणिक संस्था संस्था, न्यायालये यांच्या सभोवतालचा किती मीटर पर्यंतच्या परिसरात ध्वनि वर्जित क्षेत्र असे संबोधण्यात येते?**

(अ)५०मी. (ब)६५.मी. (क)४५मी. (ड)१००मी.

**प्र.१८-रात्री विद्युतदिवे गेल्यानंतर सौर ऊर्जेच्या कोणत्या साधनाने प्रकाश मिळू शकतो?**

(अ)सौर तापक (ब)सोर लॅण्टर्न (क)सौरचूल (ड)सौर चार्जर

**प्र.१९-मानवामध्ये ........... गुणसूत्रे असतात?**

(अ)४४ (ब)३२ (क)४६ (ड)५२

**प्र.२०-पुढील कोणत्या भागात अन्नाचा साठा असतो?**

(अ)आदिमूळ (ब)दल (क)अंकूर (ड)बिया

**प्र.२१-जीभेच्या दोन्ही कडा कोणती चव ओळखतात?**

(अ)खारट (ब)कडू (क)गोड (ड)आंबट

**प्र.२२-मानवी शरिरात प्रत्येक चक्राच्यावेळी रक्त हृदयातून...... वेळ जाते?**

(अ)एक (ब)दोन (क)तीन (ड)चार

**प्र.२३-गटात न बसणारा शब्द किंवा पद शोधा.**

(अ)मंगळ (ब)बुध (क)शनि (ड)रवि

**प्र.२४-दाढी करताना कोणता आरसा वापरतात?**

(अ)सपाट आरसा (ब)बहिर्वक्र आरसा
(क)अंतर्वक्र आरसा (ड) यापैकी नाही

**प्र.२५-आम्ल पदार्थाची चव कशी असते?**

(अ)खारट (ब)आंबट (क)तुरट (ड)गोड

**प्र.२६-MTDC चा अर्थ काय?**

(अ)महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ
(ब)महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट महामंडळ
(क)महाराष्ट्र टेलिफोन विकास महामंडळ
(ड)यापैकी नाही.

**प्र.२७-नकाशात पर्वतीय प्रदेश दर्शविण्यासाठी कोणता रंग वापरतात?**

(अ)निळा (ब)हिरवा (क)तांबडा (ड) तपकिरी

**प्र.२८-ध्वनीचे प्रसारण कशातून कशातून होत नाही?**

(अ)हवेतून (ब)द्रवातून (क)स्थायूतून (ड)निर्वाततेतून

**प्र.२९-निरोगी माणसाच्या शरीराचक तापमान ......... फॅरेनहाईट असते?**

(अ)३७° (ब)९६.४° (क)९८.४° (ड)९७.४°

**प्र.३०-मराठी महिन्याची सुरूवात भाद्रपदासून होते असे समजल्यास त्यावर्षातील आठव्या महिन्याचे शेवटचे अक्षर कोणते?**

(अ)क (ब)न (क)ख (ड)त्र

**प्र.३१-हत्तीला जिराफ म्हटले, जिराफास वाघ म्हटले, वाघास उंदिर म्हटले, उंदरास कोल्हा म्हटले, कोल्ह्यास हत्ती म्हटले आणियांचा आकारमानुसार चढता क्रम लावल्यास सर्वात शेवटी काय येईल?**

(अ)जिराफ (ब)वाघ (क)उंदिर (ड)हत्ती

**प्र.३२- चंद्र : पृथ्वी :: बुध :?**

(अ)धूमकेतू (ब)आकाशगंगा (क)पृथ्वी (ड)सुर्य

**प्र.३३- अक्षय ऊर्जा दिन: २० ऑगस्ट ::? : २२ :: मार्च**

(अ)जागतिक जल दिन (ब)जाबतिक महिला दिन
(क)साक्षरता दिन (ड)जागतिक एड्स दिन

**प्र.३४-१३ : १४५ :: १५ :?**

(अ)१६५ (ब)५७८ (क)१९७ (ड)१८४

**प्र.३५-६,११,२१,४१,........**

(अ) ६१ (ब) ८२ (क) ९२ (ड) ८२

## महाराष्ट्र पोलीस भरती
## सराव प्रश्नपत्रिका

**प्र.३६-B, E, K, Q,.......**

(अ) W (ब)S (क)U (ड)Y

**प्र.३७-एका सांकेतिक भाषेत कुत्र्याला मांजर म्हटले सिंह म्हटले, सिंहाला हत्ती म्हटले हत्तीला ससा म्हटले तर जंगलाचा राजा कोणाला म्हणावे?**

(अ)मांजर (ब)ससा (क)वाघ (ड)हत्ती

**प्र.३८-राम,श्याम व जॉन यांच्या वयाची सरासरी १६ वर्षे आहे.राम व शाम यांच्या वयाची सरासरी १४ वर्षे आहे तर जॉनचे वय किती वर्षे आहे?**

(अ)२० (ब)१६ (क)२४ (ड)१८

**प्र.३९-सकाळी १० वाजल्यापासून दुपारी दोन वाजेपर्यंत मिनीट काटा तास काट्याला किती वेळा ओलांडतो?**

(अ)तीन वेळा (ब)चार वेळा (क)पाच वेळा (ड)दोन वेळा

**प्र.४०-१०० पुस्ताकंच्या गठ्यात मराठी, गणित,हिंदी, इंग्रजी या क्रमाने पुस्तके ठेवल्यास ५९ व्या क्रमांकावर कोणत्या विषयाचे पुस्तक असेल?**

(अ)मराठी (ब)गणित (क)हिंदी (ड)इंग्रजी

**प्र.४१-वर्षा शैलजा पेक्षा १८७ दिवसांनी लहान असून तिचा जन्म रविवारी झाला असल्यास शैलजाचा जन्म वार कोणता?**

(अ)मंगळवार (ब)बुधवार (क)शनिवार (ड)रविवार

**प्र.४२-५२ : १३ :: ७६ ?**

(अ)१९ (ब)१८ (क)३८ (ड)२२

**प्र.४३-विसंगत पर्याय ओळखा?**

(अ)हडप्पा (ब)तांबे (क)कथिल (ड)पारा

**प्र.४४-विसंगत पर्याय ओळखा?**

(अ)पितळ (ब)तांबे (क)कथिल (ड)पारा

**प्र.४५-दोन दिवसात मिनीट काटा घड्याळरच्या किती फेऱ्यापूर्ण करेल?**

(अ)१९२ (ब)४८ (क)२४ (ड)९६

**प्र.४६-एका घड्याळात ११ वाजून ४५ मिनिटे झाली आ-हेत. तास काटा व मिनीट काटा यांची अदलाअदल केल्यास किती वाजतील?**

(अ)९ वाजून ५० मिनीटे (ब)९ वाजून ५८ मिनीटे
(क)९ वाजून ४५ मिनीटे (ड)९ वाजून ४० मिनीटे

**प्र.४७-मुलांच्या रांगेत उजवीकडून ७व्या क्रमांकावर तर डावीकडून ४ थ्या क्रमांकावर रवी उभा आहे तर रांगेत एकूण किती मुले आहेत?**

(अ)११ (ब)१० (क)०९ (ड)१२

**प्र.४८-एका सांकेतिक भाषेत CITY हा शब्द GMXC असा लिहिला जात असेल तर DUTY हा शब्द कसा लिहाल?**

(अ)HYWD (ब)GYXD
(क)HYWC (ड)HYXC

**प्र.४९-जर LORD = १५,१८,२१,७ तर POND =?**

(अ)१९,१७,१८,७ (ब)१७,१९,८,७
(क)१९,१८,१७,७ (ड)१९,७,८,७

**प्र.५०-रोहन ४ कि.मी.दक्षिणेला जोतो. तो उजवीकडे वळून ६ कि.मी.जातो.पुढे डावीकडे वळुन ४कि.मी चाल-तो तर सुरूवातीच्या ठिकाणापासून तो आता किती अंतरावर आहे?**

(अ)१४कि.मी (ब)१०कि.मी (क)१६कि.मी (ड)८ कि.मी

**प्र.५१- जयाच्या शाळेच्या दरवाजाचे तोंड उत्तरेकडे आहे.जया शाळेतून निघत, दोनदा उजविकडे वळते,नंतर तीनदा डावीकडे वळते, आता जयाचे तोंड कोणत्या दिशेला आहे.?**

(अ) उत्तर (ब) दक्षिण(क) पूर्व(ड)पश्चिम

**प्र.५२- आज शुक्रवार आहे. गेल्या आठवड्यातील गुरूवारी २५ मे ही तारीख होती. पुढील आठवड्यात शुक्रवारी कोणती तारीख असेल?**

(अ) ९ जून (ब) १४ जून(क) ११जून (ड) २०जून

**प्र.५३- ११ ते ३० या संख्यांमध्ये येणाऱ्या विषम संख्यांची बेरीज किती?**

(अ) २५०(ब)३०० (क)२०० (ड) ३२५

**प्र.५४- एका परिक्षेत रमेशला ४० पैकी ३० तर उमेशला ४० पैकी २४ गुण मिळाले तर दोघांच्या टक्केवारीतील फरक किती?**

(अ) २५ टक्के (ब) ६ टक्के (क) २० टक्के (ड) १५ टक्के

**प्र.५५- १२ दिवसात १० मजूर जेवढे काम करतात तेवढेच काम ८ मजूर किती दिवसात करतील?**

(अ) १६ दिवस (ब) १५दिवस (क) १२ दिवस (ड) १४ दिवस

**प्र.५६- खालीलपैकी सर्वात लहान पूर्णांक संख्या कोणती?**

(अ) ० (ब) १ (क) -१ (ड) -१०

**प्र.५७- २,०,५,९,८ हे अंक प्रत्येकी एकदाच वापरून तयार होणारी मोठ्यात मोठी ५ अंकी संख्या व लहानात लहान ५ अंकी संख्या यांच्या वजाबाकीतील सर्व अंकाची बेरीज किती येईल.**

(अ)२७ (ब)२८ (क)२९ (ड)३०

**प्र.५८- ७.५ वर्षे + २९ महिने - अडिच वर्षे:?**

(अ) ५ वर्षे ५ महिने (ब)९८ महिने
(क) ७.५ वर्षे (ड)७ वर्षे ५ महिने

**प्र.५९- एका शाळेत राष्ट्रगीतासाठी मुली एभ्या आहेत. एका रांगेत जेवढ्या मुली आहेत तेवढ्याच रांगा केल्या आहेत. निलीमाही १५ वी विद्यार्थीनी आहे जी म्हणते मी मध्यभागी उभी आहे. तर राष्ट्रगीतासाठी किती मुली उभ्या आहेत?**

(अ)४४१ (ब)८४१ (क)१२४१ (ड) १६४१

**प्र.६०- एका कामासाठी ८ मजुरांना १७६० द्यावे लागेल,तर २० मजुरांना किती रूपये मजुरी द्यावी लागेल. ?**

(अ) रू. ४४००(ब) रू. १६७०
(क) रू. ७६१० (ड) रू. ७१६०

**प्र.६१- ५ किलो वजनाच्या एका संमिश्रणात १७% क्रोमीअम आहे. तर संमिश्रणातील क्रोमीअमचे वजन किती.?**

(अ)६८० ग्रॅम (ब)८५० ग्रॅम (क)८५ ग्रॅम (ड)८.५ ग्रॅम

**प्र.६२- एका फ्रिजची खरेदी किंमत रू.३२००० आहे. जर तो फ्रिज रू.३५२०० ला विकला तर किती टक्के नफा होईल.?**

(अ) १० %(ब)२० % (क)०.१ % (ड)०.२०%

**प्र.६३- एक वस्तू व्यापाऱ्याने रू.६४ ना विकल्याने जितका तोटा होतो त्याच्या ४ पट नफा ती वस्तू रू.८४ ना विकल्याने होतो, तर वस्तूची मुळची खरेदी किंमत किती.?**

(अ) रू.६० (ब)रू.६८ (क)रू.८० (ड)रू.७६

**प्र.६४- रामुने १० क्विंटल सोयाबीन रू.३८५०प्रति क्विंटल दराने विकले . व्यापाऱ्याने शे.२% दराने अडत आकारली तर रामुला सोयाबीनचे किती रूपये मिळतील. ?**

(अ)रू.३८७३० (ब) रू.७७० (क)रू.३७७३० (ड) रू.३८५३०

**प्र.६५- खालीलपैकी चेन्नई येथील प्रमुख विमानतळ....आहे.?**

(अ) इंदिरा गांधी (ब)छत्रपती शिवाजी
(क) नेताजी सुभाषचंद्र बोस (ड)के. कातराज

**प्र.६६-क्रेमलिन हे प्रमुख स्थळ ........... ठिकाणी आहे.**

(अ)रोम (ब)न्यूयॉर्क (क)वॉशिंग्टन (ड)मॉस्को

**प्र.६७-I.S.I ही गुप्तहेर संघटना ......... देशाची आहे?**

(अ)भारत (ब)पाकिस्तान (क)अमेरिका (ड)रशिया

**प्र.६८-पवन ऊर्जेमध्ये भारताचे स्थान जगात ........ आहे.?**

(अ)दुसरे (ब)तिसरे (क)चौथे (ड)पाचवे

**प्र.६९-रिओ ऑलिम्पिकमध्ये भारताची आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीपटू साक्षी मलिक हीने .......... के.ग्रॅ. गटात भारताला कांस्य पदक जिंकून दिले. ?**

(अ)५२ (ब)५४ (क)५६ (ड)५८

**प्र.७०-नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ......... ठिकाणी स्थित आहे.**

(अ)मुंबई (ब)पुणे (क)औरंगाबाद (ड)नागपूर

**प्र.७१-महाराष्ट्र पोलिस दलाचे मुखपत्र ........ आहे.**

(अ)पोलिय मित्र (ब)जगार (क)दक्षता (ड)यापैकी नाही.

**प्र.७२-'झुमर' लोकनृत्य .......... राज्यात प्रसिध्द आहे.**

(अ)कर्नाटक (ब)राजस्थान (क)गुजरात (ड)बिहार

**प्र.७३-'प्लेईंगइटमायवे' हे प्रसिध्द आत्मचरित्र ....... यांचे आहे?**

(अ)सुनिल गावस्कर (ब)कपिल देव
(क)सचिन तेंडूलकर (ड)अॅडम गिल ख्रिस्ट

**प्र.७४-'नारंग चषक' ......... खेळाशी संबंधित आहे. ?**

(अ)बॅडमिंटन (ब)हॉकी (क)गोल्फ (ड)बुध्दीबळ

**प्र.७५-२०१७ चे १५ प्रवासी भारतीय सम्मेलन ........ झाले ?**

(अ)बेंगळूर (ब)कोची (क)गांधीनगर (ड)हैद्राबाद

**प्र.७६-आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे! या ओळीत कोणता अलंकार आहे तो ओळखा?**

(अ)चेतनागुणोवती अलंकार (ब)यमक अलंकार
(क) उपमा (ड)उत्प्रक्षा अलंकार

**प्र.७७- कोणत्या कवीने 'गझल' हा प्रकार मराठीत रूढ केला?**

(अ)शांतारात नांदगावकर (ब)जगदीश खेबुडकर
(क)सुरेश भट (ड)जोतीबा फुले

**प्र.७८-'दोनदाजन्मलेला' हा विग्रह कोणत्या सामासिक शब्दाचा आहे?**

(अ)द्विवत (ब)अग्रज (क)अनुज (ड)द्विज

**प्र.७९-'संकेतार्थ वाक्य' ओळखा.**

(अ)शांत बसा (ब)तो शांत बसला
(क)त्याने शांत बसाने (ड)तू शांत बसलास तर मी सांगेन

**प्र.८०-खालील वाक्यात रीती भविष्यकाळी वाक्य कोणते ते सांगा?**

(अ)मी परिसर स्वच्छ करीत राहीन
(ब)मी परिसर स्वच्छ करीत होतो
(क)मी परिसर स्वच्छ करीत असे
(ड)मी परिसर स्वच्छ करतो

**प्र.८१-'बोलता-बोलता विचारमालिका तुटल्यास' कोणते विरामचिन्ह वापरले जाते.**

(अ)संयोग चिन्ह (ब)अपसारण चिन्ह
(क)स्वल्प विरात (ड)अपुर्ण विराम

**प्र.८२-'नानांचा अभिनयवाखाणण्यासारखा आहे' या वाक्याचा प्रकार ओळखा.**

(अ)उद्‌गारार्थी (ब)आज्ञार्थी (क)विध्यर्थी (ड)विधानार्थी

**प्र.८३-पोलिसांनी चोरास शोधून काढले या वाक्याचा प्रयोग ओळखा.**

(अ)सकर्मक भावे (ब)अकर्मक भावे
(क)कर्मणी (ड)सकर्मक कर्तरी

**प्र.८४-पुढीलपैकी कोणत्या शब्दाचे सामान्य रूप तेच राहते.**

(अ)किलो (ब)विटा (क)सासरा (ड)मुल

**प्र.८५-खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द अस-लेला पर्याय शोधा.**

(अ)भाषा (ब)दिशा (क)सभा (ड)वेळ

**प्र.८६-'देवघर' या शब्दाचे लिंग ओळखा.**

(अ)पुल्लिंग (ब)स्त्रीलिंग (क)नपुसकलिंग (ड)उभयलिंग

**प्र.८७-विरोधीदर्शक केवलप्रयोगी अव्यय कोणते?**

(अ)इश्श (ब)अहो (क)चुप् (ड)छट्

**प्र.८८-'क्षणोक्षणी' हे पुढीलपैकी कोणते कालवाचक क्रियाविशेषण अव्यय आहे?**

(अ)कालदर्शक (ब)सातत्यदर्शक
(क)आवृत्तिदर्शक (ड)स्थीतीदर्शक

**प्र.८९-माझा घोडा फारच सुंदर आहे या वाक्यातील सर्वनामिक विशेषण ओळखा.**

(अ)घोडा (ब)माझा (क)सुंदर (ड)फारच

**प्र.९०-'....... लोक वृक्षारोपण करतात ते पर्यावरणाचे महत्त्व जाणतात' या वाक्यात येणारे संबंधी सर्वनाम ओळ-खतात?**

(अ)हे (ब)तेच (क)जे (ड)कुणी

**प्र.९१-कोण ही गर्दी! या वाक्यातील अधारेखित सर्वनामाचा प्रकार ओळखा.**

(अ)धातूसाधित नाम (ब)प्रश्नार्थक सर्वनाम
(क)दर्शक सर्वनाम (ड)सामान्य सर्वनाम

**प्र.९२-'चालणे' हा उत्तम व्यायाम आहे.अधोरेखित नामाचा प्रकार कोणता?**

(अ)भाववाचक (ब)सामान्यनाम
(क)विशेषनाम (ड)धातूसाधित नाम

**प्र.९३-खालीलपैकी कोणते नाम 'धर्मवाचक' नाम आहे.**

(अ)कृष्ण (ब)नदी (क)हिंदू (ड)गुलाममगिरी

**प्र.९४-दंड नसलेले अक्षर पुढीलपैकी कोणते?**

(अ)द (ब)फ (क)क्ष (ड)र

**प्र.९५-मराठी भाषेत एकूण किती व्यंजने आहेत?**

(अ)३२ (ब)३४ (क)४० (ड)४८

**प्र.९६-'थोराघरचे ........ त्याला सर्व देती मान' ही म्हण पूर्ण करा?**

(अ)पान (ब)श्वान (क)बंधन (ड)सामान्य

**प्र.९७-भूलपडणे या वाक्प्रचाराचा योग्य अर्थपर्यातून निवडा.**

(अ)बेशुध्द पडणे (ब)भुरळ पडणे
(क)हरवणे (ड)मती नष्ट होणे

**प्र.९८-सव्यापसव्य करणे या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ पर्यायातून निवडा?**

(अ)सतत त्रास देणे (ब)यातायात करणे
(क)असने अवसान आणणे (ड)अतिशय काळजी घेणे

**प्र.९९-आरोग्य चांगले रहावे यासाठी माझी ताई नेहमी मोजकाच आहार घेते. खरोखर ती ....... आहे.**

(अ)खादाड (ब)खाबू (क)मितहारी (ड)उपाशी

**प्र.१००-मनालीचे डोळे माशासारखे आहेत, म्हणून तिला सर्व म्हणतात ?**

(अ)मृगनयना (ब)मीनाक्षी (क)सुनयनास (ड)सुलोचना

## वरील प्रश्नाची उत्तरे

**उत्तरे-** (१) अ (२) क (३)ब ४) अ (५) ब (६) ड (७) ड (८) ड (९) अ (१०) ब (११) क (१२) अ (१३) ड (१४) ब (१५) अ (१६) अ (१७) ड (१८) ब (१९) क (२०) ब (२१) क (२२) ब (२३) ड(२४) क (२५) ब (२६) अ (२७) ड (२८) ड (२९)क (३०) ड (३१) अ (३२) ड (३३) अ (३४) क (३५) ड(३६) अ (३७) ड (३८) अ (३९) अ (४०) क (४१) अ (४२) अ (४३) ड (४४) ड (४५) ब (४६) ब (४७) ब (४८) ड (४९) क (५०) ब (५१) ड (५२) अ (५३) क (५४) ड (५५) ब (५६) ड (५७) अ (५८) ड (५९) ब (६०) अ (६१) ब (६२) अ (६३) ब (६४) क (६५) ड (६६) ड (६७) ब (६८) ड (६९) ड (७०) ब (७१) क (७२) ब (७३) क (७४) अ (७५) अ (७६) क (७७) क (७८) ड (७९) ड (८०) अ (८१) ब (८२) ड (८३) अ (८४) अ (८५) ड (८६) क (८७) ड (८८) क (८९) ब (९०) क (९१) ड (९२) ड (९३) ड (९४) ड (९५) ब (९६) ब (९७) ब (९८) ब (९९) क (१००) ब

# mpsc/upsc राज्यसेवा परिक्षा सराव प्रश्न..

**प्र.१-कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवणे(हम दो हमारे दो) कोणत्या धोरणाच्या दोन उद्दिष्टांपैकी एक आहे?**

(१)कुटुंब नियोजन कार्यक्रम१९५२ (२)वीस कलमी कार्यक्रम
(३)राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० (४)नवीन लोकसंख्या धोरण २०११

**प्र.२-२००० च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणानुसार कुठल्या वर्षांपर्यंत आपल्या देशाची लोकसंख्या स्थिर होण्याचे उद्दिष्ट आहे?**

(१)२०४६ सालापर्यंत (२)२०५० सालापर्यंत
(३)२०४९ सालापर्यंत (४)२०४७ सालापर्यंत

**प्र.३-भारतातील खालीलपैकी कोणत्या राज्यात ९०टक्क्यांपेक्षा जास्त हिंदूंची लोकसंख्या आहे?**

(१)मध्य प्रदेश,हिमाचल प्रदेश,उत्तर प्रदेश
(२)मध्य प्रदेश,हिमाचल प्रदेश,गुजरात
(३)हिमाचल प्रदेश,मध्य प्रदेश,छत्तीसगढ
(४)पंजाब,उत्तर प्रदेश,बिहार

**प्र.४-पुढीलपैकी कोणत्या लोकसंख्या धोरणानुसार भारतीय पुरूषांचे विवाहाचे किमान वय२१ व स्त्रियांचे किमान वय १८ वर्षे निश्चित करण्यात आले?**

(१)राष्ट्रीय लोकसंख्या धोरण,१९७६
(२)राष्ट्रीय लोकसंख्या धोरण,१९७७
(३)राष्ट्रीय लोकसंख्या धोरण,२०००
(४)लोकसंख्या भविष्यचेध(२००१-२०२६)

**प्र.५-२०११च्या जनगणनेनुसार भारतातील सर्वात अधिक लोकसंच्या असलेलीपाच शहरे त्यांच्या उतरत्या लोकसंख्येच्या क्रमात कोणती आहेत?**

(१)मुंबई,दिल्ली,बंगलोर,हैदराबाद,अहमदाबाद
(२)मुंबई,दिल्ली,कलकत्ता,चेन्नई,बंगलोर
(३)मुंबई,दिल्ली,बंगलोर,अहमदाबाद,हैदराबाद
(४)मुंबई,दिल्ली, हैदराबाद,

**प्र.६-२०११च्या जनगणनेप्रमाने भारतातील किती शहरांची लोसंख्या १०लाखापेक्षा जास्त आहे.**

(१)५२ (२)२३ (३)५४ (४)५५

**प्र.७-२०११च्या जनगणनेनुसार २००१ते२०११ दरम्यानची स्त्री,साक्षरता दरातील वाढ खालीलपैकी किती होती?**

(१)५३.७% ते ६५.५% (२)५४.१% ते ६७.२%
(३)५२.३% ते ६४.४% (४)५५.३% ते ६३.२%

**प्र.८-जनगणना २०११ नुसार शहरी लोकसंख्या आणि दारिद्र्य रेषेखाली असणारी लोकसंख्या यांचा सहगुणांक-०.३९ इतका आहे. ही बाब असे दर्शविते की- ?**

(१)ज्या पध्दतीचे शहरीकरण झाले आहे त्याचा गरिबी घटविण्यासाठी फारसा काही परिणाम झाला नाही.
(२)शहरीकरणाचा गरिबी घटविण्यासाठी फार खोलवर परिणाम झाला आहे.
(३)शहरीकरणामुळे गरिबात वाढ झाली आहे.
(४)वरीलपैकी कोणताही नाही.

**प्र.९-२०११च्या जनगणनेनुसार कोणत्या रज्याचा लोकसंख्यावाढीचा दर उणे होता?**

(१)गोवा (२)त्रिपुरा (३)नागालँड (४)अरुणाचल प्रदेश

**प्र.१०-भारतीय जनगणना अहवाल,२०११नुसार जागतिक लोसंख्येच्या किती टक्के भारतीय लोकसंख्या आहे?**

(१)१६.५% (२)१७.३% (३)१७.५% (४)१७.७%

**प्र.११-२०११च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या लोकसंख्येची घनता आणि....जिल्ह्याच्या लोकसंख्येची घनता एक समान आहे.**

(१)जळगाव (२)नाशिक (३)औरंगाबाद (४)रायगड

**प्र.१२-एल.पी.जी.चा अन्वायार्थ काय?**

(१)लिक्विडीटी,प्रॉफिबिलिटी ॲण्ड ग्रोथ
(२)लिबरलायझेशन,प्रायव्हटाझेशन ॲण्ड ग्रोथ
(३)लिबरलायझेशन,प्रायव्हटाझेशन ॲण्ड ग्लोबलायझेशन
(४)वरीलपैकी नाही

**प्र.१३-सन१९९१मध्ये विकासाचे एल.पी.जी.प्रतिमान या त्यावेळेच्या अर्थ मंत्र्यांनी अमलात आणले.**

(१)पी.व्ही.नरसिंहराव (२)प्रणव मुखर्जी
(३)डॉ.मनममोहन सिंग (४)पी.चिदंगरम्

**प्र.१४-महाराष्ट्र शासनाने २०११मध्ये केलेल्या प्रशासकीय सुधारणेनुसार संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या सचिवपदी कोण असतो?**

(१)तहसीलदार किंवा नायब तहसीलदार(२)गटविकास अधिकारी
(३)ग्रामसेवक (४)तलाठी

**प्र.१५-महाराष्ट्र सरकारने अहिल्याबाई होळकर योजना कशासाठी सुरू केली?**

(१)राज्यातील मुली प स्त्रियांमध्ये स्वास्थ्य व आरोग्याबद्दल जागृति वाढविणे
(२)राज्यातील मलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे
(३)राज्यातील स्त्रियांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे
(४)राज्यातील मुली व स्त्रियांना सकस आहार पुरवणे.

**प्र.१६-महाराष्ट्र शासनाची सुमतिबाई सुकळीकर उद्यागिनी महिला सक्षमीकरण योजना कशाशी संबंधित आहे?**

(१)(अनुदान पात्र झालेल्या) पात्र महिला स्वयंसाहाय्यता समुहांना व्याज अनुदान देण्याबाबत
(२)महिला उद्योजिकांना जमीन खरेदीसाठी कर्जपुरवठा
(३)मुंबई आणि नागपूर ममधील महिला उद्योजिकांना कर माफी
(४)महाराष्ट्रातील स्वयंसाहाय्यता समूहांना ४% दराने कर्जपुरवठा करणे

**प्र.१७-सन२०११-१२ मध्ये महाराष्ट्रात कापसाचे उत्पादन अंदाजे किती झाले?**

(१)८०लाख गाठी (२)८५लाख गाठी
(३)९०लाख गाठी (४)९८लाख गाठी

**प्र.१८-महाराष्ट्र शासनाचे प्राणी संधारण बील १९९५ ज्याला राष्ट्रतीची मान्यता एक महिन्यापूर्वी मिळाली, खालील कोणत्या प्राण्यांना वगळले जेणेकरून त्यांची कत्तल केली जाऊ शकते?**

(१)बैल व सांड (२)गायी व वासरे
(३)म्हैस व तिचे बछडे (४)वरीलपैकी नाही

**प्र.१९-फोटोग्राफर ऑफ द इयर २०११ पुरस्कार कोणाला प्राप्त झाला?**

(१)शंकरराव बोरकर (२)बैजू पाटील
(३)हेमंत कुलकर्णी (४)सुभाष देशमुख

**प्र.२०-खालीलैकी कोणती व्यक्ती संस्था चळवळी संबंधी सन२०१२-२०१३ मध्ये शताब्दी नव्हती?**

(१)सहकार चळवळ (२)यशवंतराव चव्हाण
(३)मुंबई उच्च न्यायालय (४)महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**प्र.२१-सन२०२२पर्यंत देशात किती कुशल मनुष्यबळ तयार करण्याची योजना भारताचे पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी आखली आहे?**

(१)५००दशलक्ष (२)१,०००दशलक्ष
(३)५,०००दशलक्ष (४)यापैकी नाही

**प्र.२२-सप्टेंबर २०१०मध्ये पहिला आधार क्रमांक(७८२४७४३१) एका आदिवासी गावातील महिलेला प्रदान करण्यात आला, त्या कोणत्या राज्याच्या रहिवासी आहेत?**

(१)छत्तीसगढ (२)झारखंड (३)ओडीशा (४)महाराष्ट्र

**प्र.२३-वित्तीय समावेशननासाठी शासनाने २०१४मध्ये खालीलपैकी कोणती योजना अमलात आणली?**

(१)संपत्ती विवरण योजना (२)निश्चलनीकरण
(३)प्रधानमंत्री जन धन योजना (४)वरीलपैकी सर्व

**प्र.२४-त्या रराज्याचे नाव सांगा ज्या राज्याने उंचीने ४फूट पेक्षा कमी असलेल्या २१वर्षाखालील लोकांची मोजणी केली व त्यांना रु.८०० दर महिना आर्थिक सहाय्य देऊ करून इतर राज्यांसाठी आदर्श घालून दिला?**

(१)केरळ (२)गुजरात (३)उत्तराखंड (४)पश्चिम बंगाल

**प्र.२५-डी.बी.टी. हे पुढीलपैकी कशाचे संक्षिप्त रुप आहे?**

(१)डिमांड बाय ट्रेड (२)डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर
(३)डायरेक्ट बँक ट्रान्सफर (४)डिडक्ट बाय ट्रान्झक्शन

**प्र.२६-पुढील वाक्यात खाली दिलेल्या कोणाचे वर्णन केले आहे? स्कॉटीश मिशन शाळेत असताना मानव सर्वत्र समान असत-ो, हे तत्व शिकले होते. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रभावामुळे त्यांनी सामाजिक सुधारणाचे आणि जागतिक मानवतावादाचे महत्व कळले. त्यांनी विधवा पुर्नविवाहाला उघड-उघड पाठिंबा स्त्रीभ्रुणहत्येच्या प्रथेला विरोध केला.**

(१)दुर्गाराम मंछाराम (२)दादोबा तर्खडकर
(३)ज्योतीबा फुले (४)नारायण गुरू

**प्र.२७-खालील विवरणावरून व्यक्ती ओळखा?**

(अ)यांना गंगाधर गाडगीळांसारखे अर्थशास्त्राने विव्दान 'अधुनिक भारताचे शिल्पकार'मानतात.
(ब)दादाभाई नौरोजी व न्या.रानडे यांचा आर्थिक राष्ट्रवादाचा पाया त्यांच्या विचारात आढळतो.
(क)भारतीय जीवनात त्यांनी शेतीचे महत्व जानले होते.
(१)नाना शंकरशेठ (२)डॉ.भाऊ दाजी लाड
(३)भास्कर तखरडकर (४)दादोबा पांडूरंग

**प्र.२८-पुढीलपैकी कोणती संघटना स्त्रियानी स्त्रियांसाठी प्रथम उभारली होती?**

(१)आर्य महिला समाज (२)भारत महिला परिषद
(३)द मुस्लिम विमेन्स असोसिएशन (४)भारत स्त्री महामंडळ

**प्र.२९-कोणती जोडी चुकीची आहे?**

(१)सावित्रीबाई फुले सुबोध रत्नाकर
(२)पंडित रमाबाई दि हाय कास्ट हिंदू वुमन
(३)विठ्ठल रामजी शिंदे आठवणी व अनुभव
(४)शाहू महाराज हिंदु कोड बिल

**प्र.३०-स्त्री मुक्ती संदर्भात खालीलपैकी कोणी कार्य केले नाही?**

(१)म.गो.रानडे (२)गो.ग.आगरकर
(३)धों.के.कर्वे (४)वरीलपैकी नाही

**प्र.३१-''वेद हे अपौरुषेय नसून आर्यांनी त्यांची निर्मिती केली आहे''असा विचार मांडणारे विचारवंत कोण?**

(१)डॉ.बाबासाहेब आंबेडकर (२)विठ्ठल रामजी शिंदे
(३)महात्मा जोतीबा फुले (४)शाहू महाराज

**प्र.३२-कॉंग्रेस स्थापनेसंदर्भातील 'सुरक्षा झडप सिंध्दांत'ला दंतकथा संबोधून कोणी नाकारले आहे?**

(१)ए.ओ.ह्यूम (२)ए.आर.देसाई (३)ताराचंद (४)बिपन चंद्र

**प्र.३३-'बहिष्कार हे अस्त्र पराकाष्ठेचा उपाय म्हणून राखून ठेवावे'असे कोणाचे मत होते?**

(१)महादेव गोविंद रानडे (२)गोवाळ कृष्ण गोखले
(३)फिरोझशहा मेहता (४)दादाभाई नौरोजी

**प्र.३४-आरंभकालीन राष्ट्रवाद्यांनी२०व्या शतकातील स्वातंत्र्यचळवळीसाठी भक्कम पाया घातला:**

(१)अर्जविनंत्यांच्या राजकारणाव्दारे
(२)घटनात्मक साधनांव्दारे
(३)आंदोलनात्मक मार्गाव्दारे
(४)वसाहतवादाच्या आर्थिक समीक्षेव्दार

**प्र.३५-......या मिथिलेतील बंगाली कवीला हिंदू राज्यकर्त्यांचे आणि बंगालच्या सुल्तानांचे प्रोत्साहन मिळाले होते.**

(१)देवेंद्रनाथ टागोर (२)रविंद्रनाथ टागोर
(३)चंडीदास (४)विद्यापती ठाकुर

**प्र.३६-पुणे येथे.....उत्सव साजरा केल्यावर दहा दिवसातच पुण्याचे कलेक्टर श्री.रँड व दुसऱ्या अधिकाऱ्याची, सरकारी घरातून परत येताना गोळ्या झाडून हत्या करण्यात आली.**

(१)शिवाजी (२)गणपती (३)दुर्गा (४)नवरात्री

**प्र.३७-'इंडियन ओपिनियन'हे वर्तमानपत्र कोठून सुरू करण्यात आले?**

(१)बंगाल प्रांत (२)ब्रिटन (३)दक्षिण आफ्रिका (४)फ्रान्स

**प्र.३८-मध्यवर्ती खिलाफत समितीच्या अलाहाबाद येथील सभेत राष्ट्रीयवादी हिंदू विजयी झाले. त्यांना.....यांचा पाठिंबा होता.**

(१)टिळक (२)गांधीजी (३)अली बंधू (४)मोतीलाल नेहरू

**प्र.३९-खालीलपैकी कोणता असहकार चळवळीचा भाग नव्हता?**

(१)शाळांवरील बहिष्कार (२)न्यायालयांवरील बहिष्कार
(३)परदेशी कापडांवरील बहिष्कार (४)कर न भरणे बहिष्कार

**प्र.४०-६एप्रिल१९३० रोजी गांधीजींना दांडी येथे सविनय कोयदेभंगाच्या चळवळीला सुरूवात केली, त्याच वेळी ६एप्रिल१९३० ला महाराष्ट्रात......या मुंबईच्या उपनगरात चळवळीचा आरंभ झाला.**

(१)वडाळा (२)वाडीबंदर (३)विले पार्ले (४)अंधेरी

**प्र.४१-पुढील पैकी कोणत्या व्यक्तीच्या कोल्हापूर संस्थानाशी संबंध नव्हता?**

(१)काशिनाथराव वैद्य (२)दिनकरराव सुर्वे
(३)माधवराव बागल (४)दादासाहेब सुर्वे

**प्र.४२-खालीलपैकी कोणता क्रांतिकारक विचाराने व समाजवादी होता?**

(१)दामोदर चाफेकर (२)विनायक दामोदर सावरकर
(३)अरविंद घोष (४)भगत सिंग

**प्र.४३-तरुण बंगाली'यंग इटली'शी परिचित होते.....यांच्या भाषणातून त्यांचा 'यंग इटली'शी परिचय झाला होता.?**

(१)सुरेंद्रनाथ बॅनर्जी (२)रविंद्रनाथ टागोर
(३)स्वामी विवेकानंद (४)राजा राम मोहन रॉय

**प्र.४४-......यांनी रोम आणि पॅरिस मध्येही'फ्री अंडिया सेंटर्स'सुरू केली होती.**

(१)सुभाषचंद्र बोस (२)मॅडम कामा
(३)ॲनी बेझंट (४)श्यामजी कृष्ण वर्मा

**प्र.४५-'पाकिस्तान' हा शब्द सर्वप्रथम कोणी वापरला?**

(१)बॅरिस्टर जिन्ना (२)सर सय्यद अहमद
(३)मुहम्मद इकबाल (४)रहमत खान

**प्र.४६-.....यांच्या शिवाय देशातील जवळजवळ सर्वच प्रमुख व्यक्ती कॉंग्रेसमध्ये सामील झाल्या होत्या?**

(१)मौलाना हुसेन अहमद (२)सर सय्यद
(३)जाफर अली खान (४)हकीम अजमल खान

**प्र.४७-हिंदू मुस्लीत ऐक्याचे दूत असे जिनांचे वर्णन कोणी केले आहे?**

(१)महात्मा गांधी (२)सरोजिनी नायडू
(३)जवाहरलाल नेहरू (४)तेज बहादूर सप्रू

**प्र.४८-प्रशासकीय सेवांसाठी विद्यापीठाची पदवी ही आवश्यक वाटू नये असे कोणत्या आयोगाने म्हटले आहे?**

(१)डॉ.राधाकृष्ण आयोग (२)कोटरी आयोग
(३)हंटर आयोग (४)वरीलपैकी नाही

**प्र.४९-इंग्रजी शिक्षित बंगाली पहिल्या पिढीचा परवलीचा शब्द....हा होता.**

(१)राष्ट्रवाद (२)बुध्दिप्रामाण्यवाद
(३)पाश्चात्तीकरण (४)वरीलपैकी नाही

**प्र.५०-१९६२साली जेव्हा चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा भारताचे संरक्षणमंत्री कोण होते?**

(१)जवाहरलाल नेहरू (२)पी.सीतारामय्या
(३)कृष्ण मेनन (४)अरूण मेहता

**प्र.५१-'पंचशील'वर सर्व प्रथम सही करणारे दोन देश कोणते?**

(१)भारत व फ्रान्स (२)भारत व इंग्लंड
(३)भारत व जपान (४)भारत व चीन

**प्र.५२-जागतिक शांतता व आंतराष्ट्रीय सहकार्य यासाठी भार-ताने कोणत्या पुरस्कार केला?**

(१)सर्व धर्म समभाव (२)अलिमतवाद
(३)पंचशील (४)नि:शस्त्रीकरण

**प्र.५३-दोन कोरड्या रोट्या एक पेलाभर पाणी आणि प्रत्येक संपाकियाबद्दल अहा वर्षे सक्तमजुरी या पगारावर कोणत्या वृत्तपत्राने संपादकपदाची जाहिरात दिली होती?**

(१)केसरी (२)स्वराज्य (३)वंदे मातरम् (४)काळ

**प्र.५४-मुंबई आणि महाराष्ट्र यांच्यातील नाते वर्णन करताना जशी गरुडाला पंख आणि वाघाला नखं असे वर्णन कोणत्या कवी ने केले?**

(१)अमर शेख (२)अण्णाभाऊ साठे
(३)प्र.के.अत्रे (४)द.ना.गव्हाणकर

**प्र.५५-पुढीलपैकी विजोडी व्यक्ती ओळखा.**

(१)शंकरराव देव (२)गंगाधरराव देशपांडे
(३)पुंडलीकजी कातगडे (४)भास्कर विष्णू काळे

**प्र.५६-वनस्पतींना व्दिनामपध्दती कोणत्या वनस्पती शास्त्राज्ञाने सुरू केली?**

(१)बेसे (२)बेंथम आणि हुकर
(३)कार्लस् लिनायस (४)थिओफ्रासस्टस्

**प्र.५७-सर.जे.सीबोस,भारतीय वैज्ञानिक, यांच्यानुसार कॉटिकल थरांच्या आतील जीवंत पेशीमुळे असेंट ऑफ सॅप......ह्या क्रियेमुळे घडते?**

(१)पलसेटरी क्रिया (२)ट्रांसपिरेशन पूल सिध्दांत
(३)कोहीजन सिध्दांत (४)मूळ दाब सिध्दांत

**प्र.५८-फुलांमधील आवश्यक मंडळ कोणते?**

(१)निदल आणि परिदल (२)निदल आणि दल
(३)पुमंग आणि जायांग (४)निदल पुंज आणि पुंकेसर

**प्र.५९-वनस्पतीशास्त्रानुसार फायबर वनस्पतीपासून 'बास्ट फायबर्स' मिळतात. प्रत्यक्षात ते वनस्पतीच्या खालीलपैकी कोणत्या भागात असतात?**

(१)रसवाहिन्या (२)जलवाहिन्या (३)मुळे (४)पाने

**प्र.६०-......औषधी द्रव्य नैसर्गिक उत्पादन आहे.**

(१)मॉफीन (२)ॲम्पलीसिलीन
(३)क्लोरोक्वीनाइन (४)फिनसायक्लीडीन

**प्र.६१-कोणत्या वनस्पतीमध्ये S.S.K.अथवा $C_4$ प्रकारचे प्रकाश संश्लेषण होते?**

(१)ऊस (२)भुईमूग (३)सूर्यफूल (४)बटाटा

**प्र.६२-खालीलपैकी मॅक्रोन्यूट्रीयंट कोणते आहे?**

(१)मॅग्नेशिअम (२)मॉलीबडेनिअम
(३)बॉरॉन (४)झिंक

**प्र.६३-परपोषी जीवांमधील मुख्यत: सूक्ष्मजीव व बुरशी मृत पेशीद्रव्यातील क्लिष्ट संयुगे तोडून त्यांचे सोप्या घटकात रूपांतर करतात, जे इतर जीवांना उपयुक्त ठरतात त्या परपोषीजीवांना..... म्हणतात?**

(१)स्वयंपोषी (२)विघटक (३)भक्षक (४)मिश्रहारी

**प्र.६४-काही झाडांमध्ये तांब्याच्या कमततेमुळे सालीवर फोड व खोलवर तुकडे पडून त्यातून डिंक बाहेर येतो. अशा रोगाला.... म्हणतात.**

(१)एक्झांथिमा (२)पांढरा डोळा (३)डायबॅक (४)पेशीमृत होणे

**प्र.६५-'टिक्का' रोगाचा प्रादुर्भाव खालीलपैकी कोणत्या पिकास होतो?**

(१)कपाशी (२)गहू (३)भुईमूग (४)भात

**प्र.६६-खालीलपैकी कोणता पिष्ठमय कोणत्या घटकापासून चरबी आणि तेल मिळते?**

(१)कार्बोदके (२)फ्रक्टोज (३)सुक्रोज (४)सेल्युलोज

**प्र.६७-नैसर्गिक स्त्रोतातील कोणत्या घटकापासून चरगी आणि तेल मिळते?**

(१)कार्बोदके (२)लिपिड (३)प्रथिने (४)टर्पिन

**प्र.६८-मानवाच्या खालीलपैकी कोणत्या आंतरिक इंद्रयावर हेपिटायटिस-बी चा प्रदुर्भावव होतो?**

(१)ह्रदय (२)मेंदू (३)यकृत (४)फुफुफस

**प्र.६९-खालीलपैकी कोणता आजार बरा करण्यास'ॲग्रीमायसीस' वापरतात.......**

(१)कववक आजार (२)विषाणू आजार
(३)जिवाणू आजार (४)कवकविद्रव्य आजार

**प्र.७०-भारतातील पहिले अणुऊर्जा संयंत्र १९६३ मध्ये उभारले गेले. १९६३ ते २०११ या काळात भारतात उभारण्यात आलेल्या एकूण अणुऊर्जा संयंत्रांची संख्या सुमारे किती आहे?**

(१)दहा (२)वीस (३)तीस (४)चाळीस

**प्र.७१-जगात निर्माण होणाऱ्या विद्युत ऊर्जेपैकी किती टक्के विद्युत ऊर्जा संयंत्रातून निर्माण होते?**

(१)सुमारे ५० % (२)सुमारे २५ %
(३)सुमारे १३ % (४)सुमारे ३ %

**प्र.७२-भारताच्या अणुउर्जेच्या भविष्यातील योजनेकरता ला-गणारे एक अणुइंधन भारताच्या सकुद्र किनाराच्या मोनाझाईट वाळूत सापडते. या अणुइंधनाचे नाव काय आहे?**

(१)युरेनियम (२)थोरीयम (३)प्लुटोनियम (४)रेडियम

**प्र.७३-ज्या तंत्रज्ञानातील तज्ज्ञ व्यक्तीने १९८४ नंतर भारतातील टेलिफोनच्या दळणवळणात क्रांति घडवून आणली त्यांचे नाव काय?**

(१)विक्रम साराभाई (२)सॅम पित्रोदा
(३)राजा रामण्णा (४)माधवन नायर

**प्र.७४-डी.एन.ए. मध्ये थायमीन हा नेहमी कुठल्या अमायनो ॲसिडशी जोडी बनवितो?**

(१)ॲडेनायीन (२)सायटोसीन (३)ग्वानीन (४)थायमीन

**प्र.७५-ओडिस येथून यशस्वीरित्या प्रक्षेपित केलेल ब्राम्हेस क्षेपणास्त्र कशा पध्दतीचे आहे?**

(१)जमिनीवरून हवेत (२)हवेतून हवेत
(३) जमिनीवरून जमिनीवर (४) जमिनीवरून पाण्यात

**प्र.७६-'योजना अवकाश' म्हणूनओळखल्या जाणाऱ्या वार्षिक योजना....या काळात राबविवल्या गेल्या.**

(१)१९६५-६६ (२)१९६६-६९
(३)१९६७-७० (४)१९६८-७१

**प्र.७७-जिप्समचाा वापर कोणत्या जमिनी सुधाररण्यासाठी होतो?**

(१)आम्ल जमिनी (२)चोपन जमिनी
(३)खारवट जमिनी (४)यापैकी नाही

**प्र.७८-पुढीलपैकी कोणत्या जमिनीमध्ये स्फुरदाचे स्थिरीकरण जास्त होते?**

(१)विम्लधर्मीय (२)आम्लधर्मीय
(३)क्षायुक्त (४)चुनखडीयुक्त

**प्र.७९-६% पेक्षा कती उतार असणाऱ्या जमिनीकरिता कोणत्या प्रकारचे बांध अधिक योग्य असतात?**

(१)ढळीचे बांध (२)समतल बांध
(३)बंदिस्त बांध (४)जैविक बांध

**प्र.८०-जमिनीमध्ये पाणी कोणत्या ऊर्जेव्दारे शोषण करून साठविले जाते?**

(१)गुरूत्वाकर्षीय (२)केषाकर्षीय
(३)ऑस्मॉटिक (४)वातावरण दाब

**प्र.८१-'बरबटीचे' पीक कशासाठी पेरले जाते?**

(१)भाजीपाला (२)वैरण
(३)हिरवळीचे पीक खतासाठी (४)वरील सर्वांसाठी

**प्र.८२-टमाटरला कोणत्या घटकाने लाल रंग येतो?**

(१)कुरकुमीन (२)लायकोपेन (३)कॉफीन (४)लेसीथीन

**प्र.८३-कोणत्या सेंद्रीय खतात नोयट्रोजन द्रवाचे प्रमाण जाास्त असते?**

(१)शेणखत (२)निंबोळी ढेप (३)कम्पोस्ट (४)व्हर्मी कम्पोस्ट

**प्र.८४-कोणता मासा पाण्याच्या पृष्ठभागाजवळचे अन्न खाणाराा आहे?**

(१)रोहू (२)कटला (३)झिंगा (४)शार्क

**प्र.८५-मेंढीची भारतातील जात कोणती?**

(१)पश्मीन (२)काश्मीर मेरीनो (३)चेकू (४)अंगोला

**प्र.८६-उस्मानाबादी ही जात कोणत्या जनावराची आहे?**

(१)गाय (२)मेंढी (३)बकरी (४)यापैकी नाही

**प्र.८७-पॉक्स रोग कोणत्या जनावरामध्ये आढळतो?**

(१)म्हैस (२)शेळी (३)मेंढी (४)वरील सर्व

**प्र.८८-दुसरी हरितक्रांती भारताच्या कोणत्या भागात सुरू झाली?**

(१)भारताचा पूर्व भाग (२)भारताचा दक्षिण भाग
(३)भारताचा उत्तर भाग (४)यापैकी नाही

**प्र.८९-भारतात सन१९८८१-८२ ते १९९१-९२ या दशकात घाऊक किमतीच्या वाढीचा सरासरी वार्षिक दर......टक्के होता?**

(१)६ (२)९ (३)८ (४)१०

**प्र.९०-.....च्या किंमतवाढीमुळे ऑक्टोबर-नोव्हेंबर, वाढीची प्रवृत्ती दर्शविली होती.**

(१)कच्च्या मालाच्या (२)कांद्याच्या
(३)उत्पादित वस्तूंच्या (४)इंधनाच्या

**प्र.९१-महाराष्ट्रात खरीप ज्वारीचे सरासरी उत्पादन रबी ज्वारीच्या तुलनेत.....आहे.**

(१)कमी (२)जास्त (३)बरोबरीने (४)अस्थिर

**प्र.९२-खालील जोड्यांपैकी कोणती एक जोडी बरोबर आहे?**

(१)करडई : एस.८ (२)कापूस : सी एस.एच.९
(३)ऊस : को.७२१९ (४)सूर्यफूल : एन.एच.एन.४४

**प्र.९३-भारतात तूर पिकाखाली एकूण किती क्षेत्र आहे?**

(१)२५.७६ लाख हेक्टर (२)११.२६ लाख हेक्टर
(३)१३.९८ लाख हेक्टर (४)१०.०० लाख हेक्टर

**प्र.९४-महाराष्ट्रात 'जमीन सुधार योजना कायदा' कोणत्या वर्षापासून अमलात आला?**

(१)१९४१ (२)१९४३ (३)१९४७ (४)१९४८

**प्र.९५-रबी ज्वारीसाठी प्रती हेक्टर रोपांची संख्या किती असावी?**

(१)०.५० (२)१.०० (३)१.५० (४)२.००

**प्र.९६-ज्वारीमध्ये तुरीचे पीक ३:३ ओळी या प्रमाणात घेण्याच्या पध्दतीस .......म्हणतात.**

(१)दुहेरी पीक पध्दती (२)मिमश्र पीक पध्दती
(३)आंतर पीक पध्दती (४)साखळी पी पध्दती

**प्र.९७-कमी पावसाच्या प्रदेशात ......ही जलसंधाणाची पध्दत जास्त योग्य आहे.**

(१)समतल बांध (२)ढाळीचे बांध
(३)गवती बांध (४)पट्टा पध्दती

**प्र.९८-पाणलोट क्षेत्रातील खालीलपैकी कोणत्या घटकांचा परिणात हा भू-पृष्ठावरील पावसाच्या प्रवाहित पाण्यावर होतो?**

(अ)आकार (ब)घडण किंवा ठेवण
(क)टोपोग्राफी (ड)भू-रचना
(१)फक्त आकार(२)आकार व घडण
(३)आकार व भूरचना (४)दिलेल्या सर्व घटकांचा

**प्र.९९-भारताच्या पिकाकरिता खालीलपैकी कोणती जलसिंचन पध्दती योग्य आहे?**

(१)सारा पध्दती (२)सरी पध्दती
(३)मोकाट पाणी देण्याची पध्दती (४)बेसीन पध्दती

**प्र.१००-जलसिंचनाखाली सर्वसाधारणपणे.... हा पंप वा-परतात. ?**

(१)रेसिप्रोकेटिंग पंप (२)केंद्रोत्सारी पंप
(३)रोटरी पंप (४)जेट पंप

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे- (१) ३ (२) * (३) ३ ४) १ (५) १ (६) २ (७) १ (८) १ (९) ३ (१०) * (११) ३ (१२) ३ (१३) ३ (१४) १ (१५) २ (१६) १ (१७) २ (१८) ३ (१९) २ (२०) ४ (२१) १ (२२) ४ (२३) ३ (२४) ३ (२५) २ (२६) ३ (२७) १ (२८) ४ (२९) ४ (३०) ४ (३१) * (३२) ४ (३३) २ (३४) ३ (३५) ४ (३६) १ (३७) ३ (३८) २ (३९) ४ (४०) ३ (४१) १ (४२) २ (४३) १ (४४) १ (४५) ४ (४६) २ (४७) २ (४८) १ (४९) २ (५०) ३ (५१) ४ (५२) ३ (५३) २ (५४) २ (५५) १ (५६) ३ (५७) १ (५८) ३ (५९) १ (६०) १ (६१) १ (६२) १ (६३) २ (६४) १ (६५) ३ (६६) ३ (६७) २ (६८) ३ (६९) ३ (७०) २ (७१) ३ (७२) २ (७३) २ (७४) १ (७५) ३ (७६) २ (७७) २ (७८) २ (७९) २ (८०) २ (८१) १ (८२) २ (८३) २ (८४) २ (८५) २ (८६) ३ (८७) ४ (८८) १ (८९) ४ (९०) २ (९१) २ (९२) ३ (९३) २ (९४) ३ (९५) २ (९६) ३ (९७) ३ (९८) ४ (९९) ३ (१००) २**

# राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर

## पुरस्कारप्राप्त कलाकरांचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडून अभिनंदन

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ कलेच्या विविध क्षेत्रात प्रतिवर्षी नाटक, कंठसंगीत, उपशास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत, मराठी चित्रपट, कीर्तन/समाजप्रबोधन, तमाशा, शाहिरी, नृत्य, लोककला, आदिवासी गिरीजन, कलादान, प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील अभ्यासक, लोकनृत्य, लावणी/संगीतबारी,भारुड/विधीनाट्य, वाद्यनिर्मिती, झाडीपटटी, खडीगंमत, दशावतार, नमन खेळे, वहीगायन, दुर्मिळ प्रयोगात्मक कला, प्रयोगात्मक कलेशी संबधित संस्था, ध्वनीतंत्रज्ञ, संगीत संयोजन, व्हाईस ओव्हर या क्षेत्रांमध्ये ज्या कलाकारांनी प्रदीर्घ काळ सेवा केलेली आहे, अशा कलावंताना राज्य सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी सांगितले.




ज्येष्ठ पुरस्कार तीन लाख रुपये, युवा पुरस्कार एक लाख रुपये, मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे. हे सर्व पुरस्कार लवकरच मुंबई येथे सर्व कलाकारांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कारर्थींची नावे पुढील प्रमाणे.

**ज्येष्ठ पुरस्कार :-** नाटक – अरुण कदम (२०२५), कंठसंगीत – धनंजय जोशी (२०२५), वाद्यसंगीत – विजय चव्हाण (२०२५), मराठी चित्रपट – शिवाजी लोटन पाटील (२०२५), उपशास्त्रीय संगीत– उदय भवाळकर (२०२५), किर्तन/समाजप्रबोधन– गहिनीनाथ ज्ञानेश्वर औसेकर महाराज (२०२५), तमाशा– कोंडीराम आवळे (२०२५), शाहिरी– शाहिर मधुकर मोरे (२०२५), नृत्य– श्रीमती रंजना फडके (२०२५), लोककला– हरिभाऊ वेरुळकर (२०२५), आदिवासी गिरीजन – रायसिंग हिरा पाडवी (२०२५), कलादान– चंद्रकांत घरोटे (२०२५), प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील अभ्यासक व पत्रकार– प्रा. आनंद गिरी (२०२४), संजीव भागवत (२०२५), लोकनृत्य– सुभाष नकाशे (२०२४), अरविंद राजपूत (२०२५), लावणी संगीतबारी– श्रीमती शकुंतला नगरकर (२०२४), श्रीमती कल्पना जावळीकर ( २०२५), भारुड/विधीनाट्य/गौळण– श्रीमती पदमजा कुलकर्णी (२०२४), श्रीमती गोदावरी मुंडे (२०२५), वाद्यनिर्मिती करणारे कलाकार– युसुफ घडूलाल मुल्ला (२०२४), भालेराव नागोराव दडांजे (२०२५), झाडीपट्टी/दंडार/खडीगंमत– रामदास चौधरी (२०२४), बुधा भलावी (२०२५), दशावतार/नमन खेळ/वहीगायन– ओमप्रकाश यशवंत चव्हाण (२०२४), भानुदास शंभा सावंत (२०२५), दुर्मिळ प्रयोगात्मक कला व मौखिक परंपरा जपणारे व त्यांचे जतन, संवर्धन करणाऱ्या व्यक्ती/संस्था– धर्मा कांबळे (२०२४), श्रीमती साखराबाई टेकाळे (२०२५), प्रयोगात्मक कलेशी संबंधित संग्रहालय/संस्था– विश्राम ठाकर आदिवासी कला आंगण चॅरीटेबल ट्रस्ट (२०२५), तांबवेश्वर शाहिरी कलापथक (तुकाराम ठोंबरे), बीड (२०२४), ध्वनीतंत्रज्ञ संकलक/पुरस्कार– अविनाश ओक (२०२४), महेश अंबेरकर (२०२५), संगीत संयोजन– अमर हळदीपूर (२०२४), कमलेश भडकमकर (२०२५), व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट/निवेदन– अंबरीश मिश्र (२०२४), उदय सबनीस (२०२५)

**युवा पुरस्कार :-** नाटक – तेजश्री प्रधान (२०२४), भूषण कडू (२०२५), कंठसंगीत– धनंजय म्हसकर (२०२४), मयुर सुकाळे (२०२५), वाद्यसंगीत– ऋषिकेश जगताप (२०२४), वरद कठापूरकर (२०२५), मराठी चित्रपट– मधुरा वेलणकर (२०२४), शंतनु रोडे (२०२५), उपशास्त्रीय संगीत– राहुल देशपांडे (२०२४), भाग्येश मराठे (२०२५), किर्तन/समाजप्रबोधन– जयवंत बोधले (२०२४), ज्ञानेश्वर माऊली कदम ( २०२५), तमाशा– नितीन बनसोडे (२०२४), अमृता थोरात (२०२५) शाहिरी– शाहिर आझाद नाईकवडी (२०२४) शाहिरा अनिता खरात (२०२५), नृत्य– वृषाली दाबके (२०२४), संतोष भांगरे (२०२५), लोककला– संदिप पाल महाराज (२०२४), चेतन बेले (२०२५), आदिवासी गिरीजन– साबूलाल बाबूलाल दहिकर (२०२४), गंगुबाई चांगो भगत (२०२५) कलादान– श्रीमती कस्तुरी देशपांडे (२०२४), सिध्देश कलिंगण (२०२५), प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील अभ्यासक व पत्रकार– खंडुराज गायकवाड (२०२४), तेजस्विनी आचरेकर (२०२५), लोकनृत्य– दिपक बीडकर (२०२४), गणेश कांबळे (२०२५), लावणी संगीतबारी– प्रमिला लोदगेकर ( २०२४), वैशाली वाफळेकर (२०२५), भारुड/विधीनाट्य/गौळण– हमीद सय्यद (२०२४), रामानंद उगले (२०२५), वाद्यनिर्मिती करणारे कलाकार– उमा शंकर दाते (२०२४), सर्वजीत विष्णू पोळ (२०२५), झाडीपट्टी/दंडार/खडीगंमत– मुकेश देशमुख (२०२४), दुधराम परसराम कावळे (२०२५), दशावतार/नमन खेळ/वहीगायन– लक्ष्मीकांत नाईक (२०२४), रामकृष्ण कैलास घुळे (२०२५), दुर्मिल प्रयोगात्मक कला व मौखिक परंपरा जपणारे व त्यांचे जतन, संवर्धन करणाऱ्या व्यक्ती/संस्था– रेणुका शेंडगे जेजूरीकर (२०२४), प्रसाद गरुड (२०२५), प्रयोगात्मक कलेशी संबंधित संग्रहालय/संस्था– सव्यसाची गुरुकुलम लखन जाधव (२०२४), इतिहासाचे अबोल साक्षिदार बहुउद्देशिय ट्रस्ट (निलेश सकट) (२०२५), ध्वनीतंत्रज्ञ संकलक/पुरस्कार– प्रणाम पानसरे (२०२४), विराज भोसले (२०२५), संगीत संयोजन– अनुराग गोडबोले (२०२४), अमित पाध्ये (२०२५), व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट/निवेदन– मेघना एरंडे (२०२४), समिरा गुजर(२०२५). सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी अभिनंदन केले आहे.

# देशभरातील सरकारी आणि बँकिंग क्षेत्रातील उमेदवारांसाठी सध्या सुवर्णसंधी

देशभरातील सरकारी आणि बँकिंग क्षेत्रातील उमेदवारांसाठी सध्या सुवर्णसंधी सुरू आहे. NPCIL, RRB, बँक ऑफ बडोदा आणि इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक या चार प्रमुख संस्थांमध्ये एकूण पाच हजारांहून अधिक पदांसाठी भरती प्रक्रिया सुरु आहे, आणि अर्ज करण्याची अंतिम तारीख जवळ येत आहे. या भरतीत सहभागी होण्याची संधी गमावू नये, म्हणून उमेदवारांनी तात्काळ आवश्यक ती माहिती मिळवून वेळेत अर्ज करणे गरजेचे आहे.

N P C I L (न्यूक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड):NPCIL तर्फे १२२ पदांसाठी अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. यात उपव्यवस्थापक आणि कनिष्ठ हिंदी अनुवादक (Junior Hindi Translator) पदांचा समावेश आहे. पात्र उमेदवारांकडून आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि अनुभव असणे गरजेचे आहे. पदवीधर उमेदवार २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पलिळश्र.पळल.ळप या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करू शकतात. हे पद प्रशासकीय तसेच भाषांतर क्षेत्रात करिअर सुरू करण्यासाठी उत्तम संधी देतात.

**१.रेल्वे रिक्रूटमेंट बोर्ड** (RRB):

RRB तर्फे कनिष्ठ अभियंता (JE) आणि इतर तांत्रिक पदांसाठी तब्बल २,५६९ जागांची भरती जाहीर झाली आहे. उमेदवारांचे वय १८ ते ३३ वर्षे असावे. अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२५ आहे, आणि अर्ज rrbapply.gov.in वर ऑनलाईन करता येणार आहेत. रेल्वेच्या सर्वाधिक प्रतिष्ठित नोकऱ्यांपैकी एक म्हणून ही भरती करिअरसाठी सुवर्णसंधी मानली जाते.

**२.बँक ऑफ बडोदा:**

बँकिंग क्षेत्रात प्रवेश घेण्याची इच्छाशक्ती असलेल्या उमेदवारांसाठी बँक ऑफ बडोदाने २,७०० अप्रेंटिस पदांची भरती सुरू केली आहे. या अप्रेंटिसशिपमध्ये महिन्याला १५,००० रुपये निश्चित स्टायपेंड मिळेल. उमेदवार ०१ डिसेंबर २०२५ पर्यंत लरपझ्रेषलरीवर.लरपझ्र.ळप या संकेतस्थळावर अर्ज करू शकतात. ही संधी बँकिंग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळवण्यासाठी आणि भविष्यातील करिअरसाठी महत्त्वाची ठरते.

**३.इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक** (IPPB):

खझझइ तर्फे ज्युनियर असोसिएट आणि असिस्टंट मॅनेजर पदांसाठी ३०९ जागा उपलब्ध आहेत. अर्ज करण्याची अंतिम तारीख ०१ डिसेंबर २०२५ आहे आणि उमेदवार ळर्लिपश्रळपश.लरपझ्र.ळप या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करू शकतात. उमेदवारांचे वय २० ते ३५ वर्षे असणे आवश्यक आहे. बँकिंग, फायनान्स आणि व्यवस्थापन क्षेत्रातील करिअरसाठी ही भरती अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.या सर्व भरतीसाठी उमेदवारांनी अधिसूचना नीट वाचून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज वेळेत करणे अत्यावश्यक आहे. अर्ज प्रक्रियेत विलंब झाल्यास संधी गमावण्याची शक्यता असते, त्यामुळे उमेदवारांनी संबंधित संस्थांची अधिकृत संकेतस्थळे वेळोवेळी तपासणे आवश्यक आहे.

सारांशात, या चार प्रमुख संस्थांमध्ये सरकारी व बँकिंग क्षेत्रातील करिअरसाठी एकत्रितपणे पाच हजाराहून अधिक पदांसाठी भरती सुरु असून, इच्छुक उमेदवारांनी लवकरात लवकर ऑनलाइन अर्ज करून आपली संधी निश्चित करणे गरजेचे आहे. या भरतीतून उमेदवारांना स्थिर नोकरी, चांगला अनुभव आणि भविष्यातील करिअरसाठी महत्त्वपूर्ण पायरी मिळू शकते.

माहिती खात्रीची व प्रगतीची, देतो वेध भविष्याचा..
नौकरी एक्सप्रेस
नौकरी एक्सप्रेस घरपोच योजना
★ महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, संरक्षण सेवा, विविध बँका, रेल्वे, महामंडळे, सैन्य भरती, नौदल, हवाई दल, भुदल, कोस्ट गार्ड, होम गार्ड, महाराष्ट्र पोलिस भरती, रेल्वे पोलिस भरती, केंद्रीय पोलिस भरती, एनडीए, विविध शासकिय निमशासकीय यासह एमपीएससी/युपीएससी प्रश्नपत्रिका संच, चालु घडामोडी, स्पर्धा परिक्षा शब्दकोडे, या सह मुलांच्या भविष्यासाठी उत्कृष्ट व खात्रीलायक माहिती देणारे महाराष्ट्राचे एकमेव वृत्तपत्र नौकरी एक्सप्रेस!
★ या वृत्तपत्राचा घरपोच अंक मिळविण्यासाठी वार्षिक वर्गणीदार व्हा. कार्यलयाच्या वतीने प्रत्येक सोमवारी अंक घरपोच पोस्टाने पाठविण्यात येईल.
नौकरी एक्सप्रेस वार्षिक वर्गणी दर – ७५०/– रूपये
सहामाहि वर्गणी – ४००/– रूपये
-: वर्गणीदारांनी आपली वर्गणी पाठविण्याचा पत्ता :-
नौकरी एक्सप्रेस मुख्य कार्यालय
प्लॉट नंबर- पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी,
एन ५ सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३
किंवा
नौकरी एक्सप्रेस या नावाने बँक ऑफ महाराष्ट्राच्या कोणत्याही शाखेतुन खाते क्रमांक 60122255284 या खात्यात भरणा करावी व सदरील भरणा केलेली पावती ई-मेल किंवा व्हॉट्सअॅप नंबर- 9421281078 यावर पाठवावी.
Email-naukriexpress.impact@gmail.com
www.naukriexpress.co.in

# सी-टीईटी २०२६ साठी अर्ज प्रक्रिया सुरू!

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/सी-टीईटी २०२६ साठी अर्ज प्रक्रिया औपचारिकपणे सुरू झाली असून देशभरातील शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी ही अत्यंत महत्त्वाची संधी आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (CBSE) जारी केलेल्या अधिसूचनेनुसार २७ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाईन अर्ज स्वीकारले जाणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर शिक्षक पदासाठी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण करणे अनिवार्य झाल्याने सी-टीईटीसाठी मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

सी-टीईटी २०२६ : महत्त्वाच्या तारखा

अर्ज प्रक्रिया सुरू: २७ नोव्हेंबर २०२५

अर्जाची अंतिम तारीख: १८ डिसेंबर २०२५

परीक्षा दिनांक: ८ फेब्रुवारी २०२६

अॅडमिट कार्ड उपलब्धता: परीक्षा तारखेपूर्वी काही दिवस

परीक्षा वेळापत्रक:

पेपर २ : सकाळी ९.३० ते १२.००

पेपर १ : दुपारी २.३० ते ५.००

सी-टीईटी म्हणजे काय?

केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) ही केंद्र सरकारद्वारे शिक्षकांची पात्रता तपासण्यासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय परीक्षा आहे.

याचे दोन पेपर असतात:

पेपर १: इयत्ता १ ते ५ पर्यंत शिकवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी.

बालविकास, भाषा, पर्यावरण अभ्यास अशा विषयांवर आधारित.

पेपर २: इयत्ता ६ ते ८ पर्यंत शिकवू इच्छिणाऱ्यांसाठी.

गणित-शास्त्र किंवा समाजशास्त्र-इतिहास गटानुसार पेपर विभागलेला असतो.

दोन्ही पेपर देणेही शक्य असून अनेक उमेदवार कमी वयाच्या तसेच उच्च प्राथमिक शाळांमध्ये दोन्ही स्तरावर शिकवण्यासाठी पात्र ठरतात.

अर्ज कसा करायचा?

उमेदवारांनी ctet.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरावा लागेल.

अर्ज भरण्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे:

१.नवीन नोंदणी (Registration)


२.वैयक्तिक माहिती व शैक्षणिक पात्रता भरणे.

३.छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करणे.

योग्य साइज व फॉमट अनिवार्य

४.फी भरून अर्ज सबमिट करणे.

अर्ज सबमिट झाल्यानंतर दुरुस्तीची संधी दिली जाणार नसल्याने माहिती काळजीपूर्वक भरावी.



शुल्क संरचना (Fee Structure)

सर्वसाधारण संवग

पेपर १ : १०००

दोन्ही पेपर : १२००

डउ/डढ संवग

पेपर १ : ५००

दोन्ही पेपर : ६००

यंदा फीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

परीक्षा का महत्त्वाची आहे?

सी-टीईटी उत्तीर्णता ही अनेक केंद्रीय शाळा, नवोदय विद्यालय, सरकारी शाळा तसेच अनेक खाजगी शाळांमध्ये शिक्षक पदासाठी एक मूलभूत पात्रता मानली जाते.

ही परीक्षा केवळ शिक्षक पदभरतीसाठीच नव्हे तर शिक्षकांच्या गुणवत्ता मानकांचा राष्ट्रीय स्तरावर मूल्यमापन करणाराही महत्त्वाचा टप्पा आहे.

यंदाच्या परीक्षेतील तांत्रिक सुधारणा

CBSE ने परीक्षा प्रक्रिया आणखी पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी पुढील पावले उचलली आहेत:

–डिजिटल प्रणाली अधिक सक्षम

–प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या प्रक्रियेत तांत्रिक बदल

– मूल्यमापन पद्धती सुधारित

– सर्व परीक्षा केंद्रांवर सुरक्षा मानके अधिक कडक

– परीक्षा प्रक्रियेत AI-आधारित निगराणी व्यवस्था

मागील टीईटी परीक्षेत महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी सहभाग घेतल्यामुळे सी-टीईटी २०२६ मध्येही प्रचंड गर्दी अपेक्षित आहे.

कोणाला अर्ज करणे आवश्यक?

–केंद्रीय शाळांमध्ये (KVS) शिक्षक होऊ इच्छिणारे

– नवोदय विद्यालयातील उमेदवार

– सरकारी व अनुदानित शाळांमध्ये सेवा करण्याची इच्छा असलेले

– खाजगी शाळांमध्ये उच्च पगाराच्या संधी शोधणारे

– बी.एड., डी.एल.एड. किंवा समकक्ष पात्रता पूर्ण केलेले विद्यार्थी

देशभरातून हजारो उमेदवार या परीक्षेत सहभागी होतात. वेळेत अर्ज करणे, अभ्यासाची योग्य तयारी ठेवणे आणि CBSE च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे हे उमेदवारांसाठी अत्यंत आवश्यक आहे. सीबीएसईने सर्व पात्र उमेदवारांना निश्चित अंतिम मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन केले आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षा आता २२ फेब्रुवारीला

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी**/ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आता ही परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ ऐवजी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यभर एकाच दिवशी घेण्यात येणार आहे.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) तर्फे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) देखील ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. राज्यातील अनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सीटीईटी परीक्षेला बसणार असल्याने त्यांच्याकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी करण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेचा दिवस बदलत नवीन तारीख २२ फेब्रुवारी २०२६ जाहीर केली आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शाळांनी व परीक्षा केंद्रांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

नेपाळची पान ४ वरून...

त्यामुळेच चीन सांगेल त्याप्रमाणे नेपाळचे सरकार वागत आहे. भारतानेही नेपाळला वेळोवेळी त्यांची चूक दाखवून खडसावले आहे आताही भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताची बाजू स्पष्ट करतांना म्हंटले की नेपाळशही आम्ही आमच्या सीमा प्रकरणांवर एका प्रस्थापित मंचाद्वरे चर्चा करीत आहोत. दरम्यान त्यांच्या बाजूने त्यांनी काही एकतर्फी पावले उचलली आहेत, परंतु त्यांच्याकडून काहीही करून आमच्यातील परिस्थिती किंवा वास्तविकता बदलता येणार नाही.

काय आहे सीमा वाद ?

१८१६ मधील अँग्लो – नेपाळ युद्धानंतर नेपाळ आणि ब्रिटिश शासित भारत यांच्यात सुगौलीचा करार झाला. हा करार झाल्यापासून भारत आणि नेपाळ यांच्यात सीमावाद सुरू झाला. या करारा नुसार काली नदीला नेपाळची नैसर्गिक पश्चिम सीमा म्हणून निश्चित करण्यात आली. काली नदीचा पूर्वेकडच्या भागात लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हा भाग आहे. १९६० पासून हा भाग भारतीय प्रशासनाच्या नियंत्रणाखाली आहे. २०१९ साली नेपाळने या भूभागावर हक्क सांगितल्यावर भारताने त्यावर हरकत घेतली. त्यानंतर २०२० साली नेपाळने आपल्या नकाशात हा भूभाग दाखवला तेंव्हापासून दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. भारताकडून हा तणाव कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असताना नेपाळ मात्र चीनच्या नादी लागून सतत भारताच्या कुरापती काढत आहे. आताही चलनी नोटेवर हा भूभाग दाखवून नेपाळने भारताची खोड काढून दोन्ही देशातील तणाव आणखी वाढवला आहे.

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक – सन २०२६

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/येथे Maharashtra Public Service Commission (एमपीएससी) द्वारे सन २०२६ साठी

–वेळापत्रकानुसार तयारीचा आराखडा आणि टाइमटेबल ठरविणे योग्य ठरेल. म्हणजे परीक्षेच्या पूर्वसूचना, अभ्यासक्रम, विषयांची तयारी व्यवस्थित करता येईल.

–गट-ब व गट-क यांसारख्या विविध संवर्गांसाठी परीक्षा, पूर्व व मुख्य या दोन टप्प्यात घेतल्या जाऊ शकतात – त्यामुळे दोन्ही टप्प्यांचे वेळापत्रक लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.

| परीक्षा | प्रकार | तारीख / कालावधी |
|---|---|---|
| –राज्य सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा (Group -/ B - राज्यसेवा) | पूर्व | ३१ मे २०२६ (अंदाजित) (theI-Shub2) । जाहिरात डिसेंबर २०२५ पर्यंत अपेक्षित (theI-Shub2) |
| –राज्य सेवा राजपत्रित मुख्य परीक्षा (State Services Main) | मुख्य | २९ मार्च – २६ एप्रिल २०२६ (वेगवेगळ्या सत्रांमध्ये) (Hindustan Times3) & निकाल जुलै २०२६ पर्यंत अपेक्षित (Hindustan Times3) |
| –गट-ब (Non-Gazetted) संयुक्त पूर्व परीक्षा | पूर्व | १४ जून २०२६ (अंदाजित) (theI-Shub) मुख्य परीक्षा डिसेंबर २०२६ रोजी असू शकते (Pune Mirror) |
| –गट-क (Group C) संयुक्त पूर्व परीक्षा | पूर्व | ४ जानेवारी २०२६ (अंदाजित) (Hindustan Times) निकाल मार्च २०२६मध्ये अपेक्षित (MahaBharti.in1) |
| –वनसेवा मुख्य परीक्षा (Forest Service Main) | मुख्य | ५-९ मे २०२६ (अंदाजित) (Hindustan Times) निकाल ऑगस्टमध्ये अपेक्षित (Hindustan Times) |
| –अभियांत्रिकी / कृषी सेवा मुख्य परीक्षा | मुख्य | १६ मे २०२६ (अंदाजित) (Hindustan Times3) निकाल ऑगस्टमध्ये अपेक्षित (Hindustan Times) |

जाहीर करण्यात आलेले किंवा अंदाजित स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक पुढे दिले आहे. हे अंदाजित वेळापत्रक असून काहीही बदल होऊ शकतात – त्यामुळे अर्ज व कहतेसमयी अधिकृत संकेतस्थळावरून तपासणे महत्त्वाचे आहे.

मुख्य परीक्षा व त्यांची अंदाजित तारीखा

**काही महत्त्वाची सूचना**

–ही वेळापत्रके अंदाजित / तात्पुरती आहेत – कारण आयोगाने शासनाकडून मागणीपत्र (requisition) प्राप्त झाल्यानंतरच अचूक ठरवलेले वेळापत्रक जाहीर करतो.

–उमेदवारांनी प्रवेशपत्र, वेळापत्रक व बदलांबाबत आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर नियमितपणे भेट द्यावी.

स्वसुख निरभिलाषः खिद्यते लोकहेतोः

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

–वेळापत्रकात दिलेल्या तारखा अचूक दिवसांसाठी आहेत असे गॅरंटी नाही – बदल होऊ शकतात किंवा पुढे ढकलल्या जाऊ शकतात.

जर तुम्हाला विशिष्ट परीक्षा (उदा. गट क किंवा गट ब, किंवा अभियांत्रिकी सेवा) या संदर्भात अधिक तपशील (अभ्यासक्रम, पात्रता, पेपर पॅटर्न) पाहायचे असतील, तर आनंदाने मदत करू शकतो – हवा असल्यास सांगा.

१: https://mahabharti.in/mpsc-2026-timetable/?utmšsource=chatgpt.com MPSC च्या २०२६भरती परीक्षांचे वेळापत्रक जाहीर MPSC 2025 ...

२:https://theiashub.com/upsc/mpsc-notification/?utmšsource=chatgpt.com MPSC Notification 2026, Exam Date, PDF Download, ...

## पुणे महानगरपालिकेची कनिष्ठ अभियंता पदांसाठीची परीक्षा अखेर पुढे ढकलली



**नौकरी एक्सप्रेस**

**पुणे/ प्रतिनिधी**

/महापालिकेतर्फे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ही १६९ पदे भरण्यासाठी एक डिसेंबर रोजी नियोजित असलेली परीक्षा पुढे ढकलली आहे. या परीक्षेची सुधारित तारीख लवकरच जाहीर होईल, असा दावा प्रशासनाने केला आहे. मात्र, निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यास ही भरती रखडण्याची दाट शक्यता आहे.

या १६९ पदांसाठी ४२ हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. महापालिके तर्फे 'इन्स्टिट्यूट ऑफ बैंकिंग पर्सोनेल सिलेक्शन' अर्थात, 'आयबीपीएस' मार्फत ही परीक्षा घेतली जाणार आहे. याआधी लोकसभा, विधानसभा निवडणुकीमुळे ही भरती प्रक्रिया रखडली होती. त्यानंतर मराठा आरक्षणाच्या प्रक्रियेमुळे भरती रखडली होती. आता महापालिका निवडणुकांची चर्चा आहे.

महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यास नही ही भरती तिसऱ्यांदा आचारसंहितेच्या कचाट्यात सापडण्याची शक्यता आहे. अन्य परीक्षा, कामांमुळे– आचारसंहितेपूर्वीच ही परीक्षा व्हावी, यासाठी महापालिका आग्रही होती. त्यानुसार 'आयबीपीएस' ने एक डिसेंबर रोजी राज्यातील २० शहरांत ही परीक्षा घेण्याची तयारी दर्शवली. त्यानुसार नियोजनही झाले होते. मात्र, राज्यातील नगरपालिका, नगर परिषदांसाठी दोन डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. काही परीक्षार्थी सध्या सरकारी सेवेत असून, त्यांना मतदानाचे कामकाज आहे. काहींना दूरचे परीक्षा केंद्र मिळाल्याने त्यांना परीक्षा संपवून वेळेत मतदान करणे शक्य होणार नव्हते. अन्य काही परीक्षाही एक डिसेंबर रोजीच असल्याने अनेक परीक्षार्थींनी परीक्षेची तारीख पुढे ढकलण्याची मागणी केली होती. काही विद्यार्थ्यांनी निवडणूक आयोगाकडेही याबाबतचे निवेदन पाठवले होते.

**पुणे महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता पदासाठीची परीक्षा आता पुढे ढकलण्यात आली आहे. १ डिसेंबरच्या निर्धारित तारखेस ही परीक्षा होत होती; पण काही कारणांमुळे ती आता उशिरा होईल. निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे भर्ती प्रक्रियेत थोडी अडचण येऊ शकते. यासाठी नवीन परीक्षा तारीख लवकरच जाहीर केली जाईल. याशिवाय, परीक्षेचा निकाल दोन महिन्यांनी देण्यात येण्याच्या प्रस्तावावर कंत्राटदार असोसिएशनने आपत्ती घेतली आहे.**

परीक्षार्थी गुरुवारीही गुरुवारीही मोठ्या प्रमाणात महापालिकेत आले आणि त्यांनी ही परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती. भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष दुष्यंत मोहोळ यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळानेही आयुक्त नवलकिशोर राम यांची भेट घेऊन परीक्षा पुढे ढकलण्याची विनंती केली होती. या सर्व गोष्टींचा विचार करून पालिकेने ही परीक्षा पुढे ढकलली आहे.

'आयबीपीएस'शी चर्चा करून परीक्षेची नवी तारीख लवकरच जाहीर केली जाईल. परीक्षा केंद्रांबाबतच्या अडचणी व अन्य बाबींसाठी 'आयबीपीएस'च्या अधिकाऱ्यांशी चर्चा करू.

**– नवलकिशोर राम, आयुक्त,**

**परीक्षेचा निकाल तत्काळ लावा –**

पुणे महापालिकेत कनिष्ठ अभियंता या पदासाठीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. त्याचा निकाल दोन महिन्यांनी लावणार असल्याचे महापालिकेने जाहीर केले. निकालाच्या कालावधीवर 'पुणे कंत्राटदार असोसिएशन' ने आक्षेप घेतला आहे. त्याबाबत महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांची भेट घेऊन त्यांच्याकडे परीक्षा झाल्यानंतर निकाल लावण्यास दोन महिन्यांचा कालावधी कशासाठी, असा सवाल उपस्थित केला आहे. परीक्षेचा निकाल तातडीने लावा, अशा शब्दांत 'असोसिएशन'ने मागणी केली आहे.या संदर्भात 'पुणे कंत्राटदार असोसिएशन'चे अध्यक्ष रवींद्र भोसले यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन त्यांचे लक्ष वेधले. या वेळी संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

कनिष्ठ अभियंता पदाच्या यापूर्वी झालेल्या प्रवेश परीक्षेनंतर परीक्षेचा निकाल लागणे आणि गुणवत्ता यादी जाहीर करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी गेला. वास्तविक ऑनलाइन परीक्षा असताना परीक्षा झाल्यानंतर त्याच वेळी उमेदवारास त्याचे गुण आणि त्याचा गुणवत्ता क्रमांक समजणे अपेक्षित आहे, याकडे कंत्राटदार असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र भोसले यांनी महापालिका आयुक्तांचे लक्ष वेधले.

## पुणे विद्यापीठातील शिक्षक पदांसाठी मोठी संधी!



**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ८ नोव्हेंबर २०२५ पासून शिक्षक भरती प्रक्रिया सुरू केली असून इच्छुक उमेदवारांना ७ डिसेंबर २०२५ पर्यंत अर्ज व सुधारणा करण्याची संधी उपलब्ध आहे. ही भरती विद्यापीठाच्या शिक्षणाच्या दर्जाला उंचावण्यासाठी महत्वाची असून, राज्यभरातून या पदांसाठी उमेदवार मोठ्या प्रमाणावर अर्ज करत आहेत.

या भरतीत प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि सहाय्यक प्राध्यापक पदांसाठी एकूण १११ रिक्त पदे आहेत.

- प्राध्यापक पदासाठी ३३ जागा
- सहयोगी प्राध्यापक पदासाठी ४५ जागा
- सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ३२ जागा

ही भरती प्रक्रिया विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाइटवर ८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रकाशित शुद्धिपत्राद्वारे अधिकृत करण्यात आली आहे. मूळ जाहिरात ३१ सप्टेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध झाली होती, परंतु काही अडचणी व शैक्षणिक प्रक्रियेच्या कारणास्तव भरती थोडी वेळाने सुरू करण्यात आली.

यापूर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांना त्यांच्या अर्जातील त्रुटी सुधारण्याची संधी देखील या प्रक्रियेत आहे. त्यामुळे नवीन उमेदवारांसह जुने अर्जदारही या प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. अर्ज ऑनलाइन करण्याची अंतिम तारीख ९ डिसेंबर २०२५ आहे, त्यामुळे इच्छुकांनी वेळेत अर्ज करून आपल्या पात्रतेनुसार संधीचा लाभ घ्यावा.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षक कल्याण विभागाचे प्रा. डॉ. संदीप भोळे यांनी सांगितले की, इच्छुकांनी अधिसूचना काळजीपूर्वक वाचून योग्य प्रकारे अर्ज करावा आणि नियुक्तीची सुवर्णसंधी गमावू नये. ही भरती फक्त शिक्षक पदांसाठीच नाही, तर विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यास महत्त्वपूर्ण ठरेल.सर्व इच्छुक उमेदवारांनी लवकरात लवकर अर्ज प्रक्रिया पूर्ण करणे आणि सर्व आवश्यक कागदपत्रांची योग्य तयारी करून ठेवावी. ही संधी मिळाल्यास तुम्हाला पुणे विद्यापीठाच्या प्रतिष्ठित शैक्षणिक वातावरणात काम करण्याची अनमोल संधी मिळेल.

## आता JEE न देता IIT प्राध्यापकांकडून थेट शिक्षण घेण्याची संधी

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** अनेक विद्यार्थी आयआयटीमध्ये प्रवेश घेण्याचे स्वप्न पाहतात. आयआयटीचा दर्जा, उत्तम प्राध्यापक, जागतिक स्तरावरील सुविधा यामुळे तिथे शिक्षण घेण्याची प्रत्येकाची इच्छा असते. पण JEE (Joint Entrance Examination) ही भारतातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक आहे. अनेक प्रयत्न करूनही असंख्य विद्यार्थी गएए उत्तीर्ण होत नाहीत आणि आयआयटीचे स्वप्न अपुरे राहते.

**विद्यार्थ्यांसाठी मोठी सुवर्णसंधी!**

मात्र आता आयआयटी मद्रासने विद्यार्थ्यांसाठी एक मोठी भेट जाहीर केली आहे. या उपक्रमामुळे गएए न देता, प्रवेश परीक्षा न देता, कोणतेही शुल्क न भरता तुम्ही आयआयटीचे वर्ग घेऊ शकता आणि मशीन लर्निंगसारखे आजच्या युगातील सर्वाधिक मागणी असलेले कौशल्य शिकू शकता.

कोर्स विषयी सविस्तर माहिती

IIT Madras ने NPTEL SWAYAM$^2$ प्लॅटफॉर्मवर १२ आठवड्यांचा Introduction to Machine Learning हा पूर्णपणे मोफत कोर्स सुरू केला आहे.

याची खासियत म्हणजे–

JEE ची गरज नाही

प्रवेश परीक्षेची आवश्यकता नाही

कोर्स पूर्णपणे मोफत

IIT प्राध्यापकांचे व्हिडिओ लेक्चर्स

असाइनमेंट, नोट्स व अभ्यास साहित्य विनामूल्य

प्रमाणपत्र हवे असल्यास फक्त १००० मध्ये परीक्षा

हा कोर्स IIT चरवीरी मधील प्रसिद्ध प्राध्यापक प्रो. बलरामन रवींद्रन यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला आहे. ते मशीन लर्निंग आणि डेटा सायन्स क्षेत्रातील अत्यंत अनुभवी तज्ज्ञ आहेत.

कोर्समध्ये काय शिकता येईल?

हा कोर्स मशीन लर्निंगचा पायाभूत ते प्रगत स्तरापर्यंतचा प्रवास समजावतो. शिक्षणाची पद्धत व्यवस्थित आणि क्रमवार असल्याने नवशिके देखील सहज शिकू शकतात.

मुख्य विषय

–मशीन लर्निंगची मूलभूत संकल्पना

–सुपरवाइज्ड आणि अनसुपरवाइज्ड लर्निंग

–लिनियर रिग्रेशन, लॉजिस्टिक रिग्रेशन

–सपोर्ट व्हेक्टर मशीन

–डिसिजन ट्री आणि रँडम फॉरेस्ट

–न्यूरल नेटवर्कचे मूलभूत तत्त्व

–प्रॉबॅबिलिटी व स्टॅटिस्टिक्सचा मशीन लर्निंगमध्ये वापर

–रिअल लाईफ चङ मॉडेल कसे तयार करतात

प्रत्येक आठवड्याला व्हिडिओ लेक्चर्स, नोट्स आणि प्रॅक्टिकल असाइनमेंट्स उपलब्ध असतात.

**पुढील वृत्त पान ३ वर..**

## संक्षिप्त

### १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजेपर्यंत प्रचार थंड




नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी लागू होणाऱ्या जाहीर प्रचारबंदी संदर्भात राज्य शासनाने १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजेपर्यंतची मुदत निश्चित केली आहे. २ डिसेंबर रोजी मतदान होणार असल्याने निवडणूक प्रक्रियेत शांतता राखण्यासाठी आणि मतदारांवर कोणताही अनावश्यक दबाव येऊ नये यासाठी ही मर्यादा अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५' मधील तरतुदीनुसार, मतदानाच्या एक दिवस आधीच्या रात्री १० वाजल्यापासून सर्व प्रकारचा जाहीर प्रचार पूर्णपणे थांबवणे अनिवार्य आहे. या तरतुदींचा उद्देश मतदारांना शांततेत, कोणत्याही प्रभावापासून मुक्त राहून आपला मतदानाचा हक्क बजावता यावा हा आहे.

प्रचारबंदीच्या कालावधीत लागू होणारे नियम पुढीलप्रमाणे आहेत :१.प्रचारसभा, मोर्चे आणि रॅलींवर बंदी – कोणत्याही उमेदवाराने किंवा राजकीय पक्षाने सार्वजनिक ठिकाणी सभा घेणे, मोर्चे काढणे वा प्रचारयात्रा आयोजित करणे प्रतिबंधित राहील.

२.ध्वनिक्षेपकांच्या वापरावर निर्बंध – लाऊडस्पीकर किंवा ध्वनिक्षेपकाद्वारे प्रचार करणे, गाणी वाजवणे, जाहिरातींची घोषणा करणे यावर पूर्ण बंदी राहील.

३.माध्यमांमधील प्रचार-जाहिराती थांबवणे – टीव्ही, रेडिओ, वृत्तपत्रे, डिजिटल प्लॅटफॉर्म किंवा सोशल मीडिया यांवर निवडणूक प्रचाराशी संबंधित कोणत्याही जाहिराती, पोस्ट किंवा प्रचारात्मक सामग्री प्रसारित अथवा प्रकाशित करता येणार नाही.

४.शांतता कालावधीचे काटेकोर पालन– मतदानाच्या २४ तास आधीचा हा कालावधी 'शांतता कालावधी' म्हणून ओळखला जातो. या काळात मतदारांना कोणत्याही राजकीय प्रभावापासून वाचवण्यासाठी कठोर नियम लागू केले जातात.

५.उल्लंघन केल्यास कारवाई – प्रचारबंदीचे उल्लंघन करणाऱ्या उमेदवारांवर किंवा पक्षांवर निवडणूक आयोग आणि स्थानिक प्रशासनाकडून दंडात्मक कारवाई तसेच फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.

राज्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी हा नियम सारखाच लागू होणार असून, निवडणूक आयोगाने संबंधित जिल्हाधिकारी, पोलिस प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचे निर्देश दिले आहेत.

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण आणि निष्पक्ष राहण्यासाठी प्रचारबंदी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. मतदारांनीही या नियमांचे पालन करून मतदानाचा पवित्र हक्क शिस्तबद्धपणे बजावावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### बीज भांडवल योजनेसाठी अर्ज करण्याचे दिव्यांग व्यक्तींना आवाहन




**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या बीज भांडवल योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज विहीत नमुन्यात दोन प्रतीत सादर करावा लागणार आहे. अर्जासोबत दिव्यांगत्वाचा दाखला, दोन पासपोर्ट साईज फोटो, जन्मतारखेचा दाखला किंवा वयाचा दाखला उत्पन्नाचा दाखला एक लाखापर्यंत तहसीलदार यांचेकडून, रहिवासी दाखला किंवा जागेचे प्रमाणपत्र रेशनकार्ड. दोन प्रतिष्ठीत व्यक्तींचे दाखले (नगरसेवक/संरपंच/ग्रामसेवक/एस.ई. ओ. यांचेकडून) संबंधित व्यवसायाचे खरेदी कोटेशन १ लाख ५० हजार पर्यंत, राष्ट्रीयकृत बँकेचे नाव व शाखा, व्यवसायाचे प्रोजेक्ट रिपोर्ट (सी. ए. कडील) ज्या जागेमध्ये व्यवसाय करणार आहे. त्या जागेची बृहन्मुंबई महानगरपालिका वॉर्ड ऑफिसमधील नोंद कागदपत्रे/संमतीपत्र/भाडे प्रमाणपत्र, शॉप क्ट लायन्सेस इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

इच्छुक दिव्यांग व्यक्तींनी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर.सी. मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई – ७१ येथे संपर्क साधावा. योजनांचे अर्ज कार्यालयात उपलब्ध असल्याचेही मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांनी प्रसीद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2010/34125
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813